
दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२५४ | सोमवार, दि.६ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये







# नोंदणी झाली मात्र खरेदी होईना!

## राज्यात शासकीय सोयाबीन खरेदी केंद्रं ठप्प, नोंदणीचा आज शेवटचा दिवस

**पुणे । प्रतिनिधी**

**सध्या सोयाबीन शेतकरी उत्पादक संकटात सापडला आहे. एका बाजुला सोयाबीनला मिळणारा कमी दर तर दुसऱ्या बाजूला सरकारच्या हमीभाव केंद्रावरील सोयाबीनची खरेदी बंद आहे. शेतकरी हमीभाव केंद्रावर चकरा मारत आहेत. मात्र, सोयाबीन खरेदीसाठी क्रमांक येत नसल्याचे दिसत आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा यासाठी सरकारने खरेदी केंद्र सुरू केले. मात्र सरकारच्या नियोजन शून्य कारभारामुळे ही खरेदी केंद्र ठप्प झाली आहेत. दरम्यान सोयाबीनच्या खरेदीसाठी ६ जानेवारीपर्यंत नोंदणी सुरू राहणार होती. त्यामुळे ही मुदत सोमवारी संपणार आहे.**



बारदाना (पोते) नसल्याने राज्यातील बऱ्याच जिल्ह्यात हमीभाव खरेदी केंद्रावरील सोयाबीन खरेदीला ब्रेक लागला आहे. हजारो शेतकऱ्यांनी हमीभाव केंद्राकडे सोयाबीन विक्रीसाठी नोंदणी केली, प्रत्यक्षात मात्र खूप कमी शेतकऱ्याकडून सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. त्यामुळे खरेदी ◀◀ पान २ वर

### केंद्रच बंद ठेवण्याची नामुष्की

राज्यात नाफेड आणि एनसीसीएफ सोयाबीनची खरेदी करत आहेत. राज्यभरात ५८५ केंद्रांना सोयाबीन खरेदीची परवानगी असली तरी प्रत्यक्ष खरेदी मात्र केवळ ५६१ केंद्रांनी सुरू केली. त्यातही अडचणी असून प्रत्यक्ष खरेदी सुरू असलेल्या केंद्रांमध्ये बारदान्यांचा तुटवडा निर्माण झाल्याने खरेदी केंद्रच बंद ठेवण्याची नामुष्की ओढवली आहे .

### ७५ टक्के शेतकऱ्यांची खरेदी बाकी

सोयाबीन हमीभाव विक्रीसाठी ३१ डिसेंबरपर्यंत राज्यातील ६ लाख ७९ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. मात्र प्रत्यक्षात सुमारे दीड लाख शेतकऱ्यांचीच खरेदी होऊ शकली. म्हणजेच नोंदणीकृत शेतकऱ्यांपैकी केवळ २५ टक्केच शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी झाली आहे. ७५ टक्के शेतकयांचे सोयाबीन विकायचे बाकी आहे.

# लाडक्या बहिणींवर अन्याय करू नका !

## जयंत पाटील यांचे सरकारला आवाहन

**पुणे। प्रतिनिधी**



निवडणूकीच्या निकालानंतर आता मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची छाननी होणार आहे. २.५ लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या व घरी चारचाकी गाडी असलेल्या लाभार्थ्यांना या योजनेतून वगळण्यात येणार आहे. त्यांची पडताळणी होणार असल्याचे महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरेंनी सांगितल्यानंतर आता लाडकी बहीण योजनेत ज्या सवलती यापूर्वी दिल्यात त्या कोणत्याही परिस्थितीत बंद होता कामा नयेत. जे निकष लावायचे आहेत ते इथून पुढील नवीन लाडक्या बहिणींसाठी लावा, असे विरोधीपक्षनेते जयंत पाटील म्हणाले आहेत.

राज्यात जवळपास अडीच कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळत असून दरमहा दीड हजार रुपये या महिलांच्या बँक खात्यात जमा होत आहेत. आता, या ◀◀ पान २ वर

# मुंडेंच्या बंगल्यावर जूनमध्येच खंडणीची डाळ शिजली

## आ. सुरेश धस यांचा पुणे येथील मोर्चात मोठा गौप्यस्फोट





**पुणे । प्रतिनिधी**

**पवनचक्की खंडणीचे पाळेमुळे हे अलिकडच्या काळातील नसून ते जून महिन्यात धनंजय मुंडे यांच्या सातपुडा बंगल्यावर झालेल्या बैठकीत आहेत, असा गौप्यस्फोट आ. सुरेश धस यांनी केला आहे. तेथेच खंडणी प्रकरणाची डाळ शिजून दोन कोटीच्या खंडणीची डिल झाल्याचे सांगून सीआयडीने जर नितीन बिक्कडला उचलले तर सर्वकाही बाहेर येईल, असा दावा सुध्दा धस यांनी पुणे येथील संतोष देशमुख खून प्रकरणी निघालेल्या आक्रोश मोर्चात केला. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर चोहूबाजूने टिका केली.**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली, या घटनेने राज्यात चांगलीच खळबळ उडाली. संतोष देशमुख हत्याप्रकरणात सुरुवातीपासूनच आमदार सुरेश धस यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. आता पुन्हा एकदा त्यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. आज पुण्यात संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध करण्यासाठी आक्रोश मार्चा काढण्यात आला होता. यावेळी बोलताना धस म्हणाले, १४ जून रोजी वाल्मिक कराड, बिक्कड आणि शुक्ला यांची धनंजय मुंडे यांच्या बंगल्यावर बैठक झाली. जोशी नावाचे जे मुंडे यांचे पी. ए. आहेत त्यांच्या ◀◀ पान २ वर

### बेभान बैल असाच मोकाट सोडणार का? -मिटकरी



परभणीमधील मूक मोर्चामधील भाषणात सुरेश धस यांनी थेट अजित पवारांचा उल्लेख केल्याने यावर राष्ट्रवादीचे प्रवक्ते अमोल मिटकरींनी आक्षेप घेतला आहे. देवेंद्र फडणवीसजी आपल्या पक्षाचे आमदार सुरेश धस यांनी परभणीमधील मूक मोर्चात क्या हुआ तेरा वादा अजितदादा अशा प्रकारे वक्तव्य करुन आदरणीय अजितदादाविषयी जी गरळ ओकली त्याबद्दल आपण त्यांना जाब विचारणार की त्यांचा बेभान सुटलेला बैल आणखी मोकाट सोडणार? असा खोचक सवाल अमोल मिटकरींनी उपस्थित केला आहे.

### वाल्मिक कराडकडे १७ मोबाईल

संतोष देशमुख हत्याप्रकरणासह खंडणीच्या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मिक कराड याच्यावर सुरेश धस चांगलेच बरसले. या आकाकडे १७ मोबाईल असल्याचा दावा त्यांनी केला. वाल्मिक कराड याचा जवळचा नितीन कुलकर्णी हा अचानक गायब झाला आहे. त्याला समोर आणण्याची विनंती धस यांनी केली. वाल्मिक कराड, या आकाच्या खंडणीचे सर्व धागेदोरे या १७ मोबाईलच्या मार्फत, सीडीआरच्या माध्यमातून सहज काढता येतील असा दावा त्यांनी केला. या १७ मोबाईल आणि नितीन कुलकर्णी यांच्याविषयीची माहिती सीआयडी आणि पोलीस अधिक्षकांना दिल्याचे त्यांनी पुण्यातील सभेत सांगितले.

### अजितदादा, तुमच्या पाया पडतो, याचा राजीनामा घ्या

धनंजय मुंडे यांना पाठीशी घालू नका, त्यांना मंत्रिमंडळात ठेऊ नका, अजितदादा, तुमच्या पाया पडतो, तुमचं काय अडकलं यांच्यापाशी, सुरेश धसांची भरसभेत आवाहन केले.

### मग तुमचे गृहखाते झोपा काढत होते का? -चव्हाण

स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्येवरून आमदार सुरेश धस जाणीवपूर्वक राजकारण करत आहेत. परभणीच्या सभेत अजित दादांना क्या हुआ तेरा वादा... म्हणून दादांना प्रश्न विचारणाऱ्या सुरेश धस यांना माझा प्रश्न आहे, आरोपी स्वतः होऊन आत्मसमर्पण करत आहेत मग गृहखातं झोपा काढत आहे का? निष्पक्ष चौकशी होईल म्हणून तुमचा गृहखात्यावर आणि गृहमंत्र्यावर विश्वास नाही का? असे पोस्ट करुन सुरज चव्हाण यांनी विचारले आहे. धसांना वेळीच आवरा, दुधात मिठाचा खडा टाकण्याचे ते काम करत असल्याचेही ते म्हणाले.

# देशमुख खून प्रकरणातील आरोपींचे गुजरात कनेक्शन

## कोणाची झाली मदत; १५ दिवस एकाच ठिकाणी केला मुक्काम







**बीडः संतोष देशमुख हत्याप्रकरणी फरार झाल्यानंतर सुदर्शन घुले, सुधीर सांगळे आणि कृष्णा आंधळे या तीनही आरोपींचे गुजरात कनेक्शन समोर आले आहे. तेथे त्यांचा १५ दिवस मुक्काम होता तर फरार झाल्यावर ते पहिल्यांदा नेमके कुठे गेले?, तेथे ते किती दिवस राहीले याची माहिती तपासात उघड झाली आहे.**

संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले ◀◀ पान २ वर

### कृष्णा आंधळे कुठे?

यानंतर जवळचे पैसे संपल्याने आरोपी सुदर्शन घुलेने कोणाशी तरी संपर्क केला. आरोपी कृष्णा आंधळेला पैसे घेऊन येण्यासाठी मंदिरातून बाहेर पाठवलं. पैसे घेण्यासाठी गेलेला कृष्णा आंधळे परत न आल्यानेच सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे पैसे संपल्याने मंदिरातून बाहेर पडले आणि पुण्यात आले. पुण्यात आल्यानंतर बालेवाडी परिसरातून एका खोलीतून दोघांना अटक करण्यात आली आहे. कृष्णा आंधळे मात्र अद्याप फरार आहे.

# धनंजय मुंडे शहाणा हो, नाही तर आमचे लोक तुला आडवतील

## मनोज जरांगे पाटील यांचा इशारा; मुख्यमंत्र्यांनाही केले आवाहन

**पुणे : धनंजय मुंडे शहाणा हो. नाहीतर आमचे लोकं तुला अडकवतील.ज्या मराठ्यांनी तुला वाचवले त्यांच्यावर तू पलटलास अशा शब्दात मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली आहे. मुख्यमंत्री साहेब आवरा यांना नाहीतर आम्हीं थांबणार नाही, असे आवाहनही त्यांनी केले आहे.**



प्रतिमोर्चे काढले तर आम्हीं देखील तसेच उत्तर देवू. आम्ही देखील मोर्चाने उत्तर देवू, असे जरांगे म्हणाले. महाराष्ट्रात एक क्रूर हत्या केली गेली. यांना राज्य कुठे न्यायचे आहे? आम्ही मराठे राज्यभर मोर्चे काढू, असे जरांगे म्हणाले. संतोष देशमुख यांचा खून ◀◀ पान २ वर

### कधी, कुठे यायचे ते जरांगेंनी सांगावे-हाके



मनोज जरांगे यांनी केलेल्या वक्तव्याला ओबीसी नेते लक्ष्मण हाकेंनी प्रत्युत्तर दिले आहे. कधी, कुठे यायचे ते जरांगेंनी सांगावे, आव्हान हाकेंनी केले आहे. परभणीच्या सभेत जरांगेंनी धनंजय मुंडेंवर निशाणा साधला होता. देशमुख कुटुंबीयांना त्रास दिला तर धनंजय मुंडेंना रस्त्यावर फिरू देणार नाही. समाजाला त्रास झाला तर घरात घुसून मारू, असा इशारा जरांगे यांनी दिला. तर जरांगे चिथावणीखोर वक्तव्य करत आहेत. त्यांच्या मुख्यमंत्र्यांनी बंदोबस्त करावा, अशी मागणी हाकेंनी केली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.४ जानेवारी २०२५


आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.०० क्विंटल | ३,४५१ | ३,४५१ | ३,४५१ |
| ज्वारी/हायब्रिड : ४४.५० क्विंटल | २,७५१ | २,०७० | २,३५८ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ६.०० क्विंटल | ७,००० | ७,५८१ | ७,३४० |
| उडीद : १०.५० क्विंटल | ५,४०० | ६,९५० | ६,४०७ |
| बाजरी: ६.५० क्विंटल | ३,०२१ | ३,२५१ | ३,१५८ |
| मुग : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| सोयाबीन: ६५.०० क्विंटल | ४,०७१ | ४,१५१ | ४,१०६ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,३०० | ५,४०० | ४,८५० |

# संतोष देशमुख खून प्रकरणाचा उपयोग राजकारणासाठी करु नये

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संतापले; मोर्चासह दमानिया, गुजरात कनेक्शनवरही भाष्य

मुंबई : संतोष देशमुख खून प्रकरणा संदर्भात नीट चौकशी करू द्यावी. सगळी चौकशी पूर्ण होऊ द्यावी. आम्ही कोणालाही सोडणार नाही. याचा उपयोग राजकारणाकरता करू नये, ही अतिशय गंभीर बाब आहे, असे उत्तर दिले. हत्येचा उपयोग राजकारणाकरता होऊ नये तर त्याच्यातून समाजात काही सुधारणा व्हावी, अशी इच्छाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी बोलून दाखवली. तसेच यावेळी मुख्यमंत्र्यांनी मोर्चासह गुजरात कनेक्शन, अंजली दमानिया यांना मिळणाऱ्या धमक्यांवरही भाष्य केले आहे. ◀◀ पान २ वर



# मुंडे बहिण-भावांच्या कार्यकर्त्यांकडून धमक्या

## अंजली दमानिया यांच्याकडून कारवाईची मागणी

**मुंबई -सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी परळीतील वंजारी समाजाच्या अधिकाऱ्यांच्या संख्येवर प्रश्न उपस्थित करीत स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या काळातील संदर्भ सुध्दा दिला होता. त्यानंतर वंजारी समाजातून नाराजीचा सुर निघाला. यानंतर दमानिया यांनी पत्रकार परिषद घेऊन मुंडे बहिण-भावाच्या कार्यकर्त्यांकडून माझा मानसिक छळ केला जात असून मला धमक्या दिल्या जात असल्याचे सांगितले. फोन करणारे आणि पोस्ट करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.** ◀◀ पान २ वर



# वंजारी समाज आक्रमक; पोलिस ठाण्यातच मांडला ठिय्या

## मनोज जरांगे, सुरेश धसांवर गुन्हा दाखल करेपर्यंत माघार नसल्याची घेतली भुमिका

**बीड । प्रतिनिधी**

**परभणीतील आक्रोश मोर्चात मनोज जरांगे, आ. सुरेश धस यांनी चुकीची भाषा वापरत वंजारी समाजाची बदनामी होईल असे बोलल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी बीड येथील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात वंजारी समाज बांधव रविवारी दुपारनंतर आले. यावेळी गुन्हा दाखल करण्यात येत नसल्याने वंजारी समाज आक्रमक झाला असून जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत पोलिस ठाण्यातच ठिय्या आंदोलन करण्यात येईल, अशी वंजारी समाजाने भुमिका घेतल्याचे दिसते.** ◀◀ पान २ वर

### आरोपींना फाशी द्या, वंजारी समाजाची बदनामी का?

गुन्हेगारांना जात नसते. कोणत्याही समाजातील व्यक्ती गुन्हा करतो, त्यावेळी तो फक्त गुन्हेगार असतो. संतोष देशमुख यांना न्याय मिळायला हवा, त्यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या, आमचे त्यास समर्थन आहे. मात्र गुन्हेगार वंजारी समाजाचे असल्याने आमच्या समाजाला बदनाम करु नका, अशी हार्तहाक वंजारी समाजाची असल्याचे मोहन आघाव यांनी सांगितले आहे.



## अग्रलेख

# भ्रष्टाचाराचा सर्वव्यापी विळखा देश पोखरतोय

केंद्रातील आणि भाजपशासित राज्यांतील सरकारे भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देण्याचा कितीही दावा करत असले, तरी वास्तव बदललेले नाही. आजही देशातील १०० पैकी ६६ जणांना त्यांची कामे करून देण्यासाठी सरकारी यंत्रणेला लाच द्यावी लागते, असा दावा एका सर्वेक्षणात करण्यात आला आहे. देशात आजघडीला असा एकही विभाग नसेल जिथे लाच न घेता कामे होतात. सर्वत्र स्थिती अत्यंत वाईट आहे. बिगर-भाजप राज्यांप्रमाणेच भाजपशासित राज्यांमध्येही प्रशासकीय यंत्रणेत भ्रष्टाचार बोकाळला आहे. पण सरकारे गप्प आहेत.

देशातील केंद्र आणि राज्य सरकारे व्यवसाय सुलभ करण्यावर आणि खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीला गती देण्यावर भर देत आहेत. त्याचवेळी, भ्रष्ट सरकारी यंत्रणा आपली पूर्ण क्षमता वापरून कंपन्या आणि उद्योजकांकडून बेकायदेशीरपणे पैसे उकळत आहेत. यामुळे देशात उद्योजकतेला चालना देण्यासाठी सिंगल विंडो क्लिअरन्स आणि व्यवसाय सुलभता यांसारखे प्रयत्न निष्फळ होताना दिसत आहेत. सरकारी सेवा मिळविण्यासाठी सुमारे ६६ टक्के कंपन्यांना लाच द्यावी लागत असल्याचे एका सर्वेक्षणातून समोर आले आहे. कंपन्यांनी दावा केला की, त्यांनी पुरवठादाराची पात्रता, कोटेशन, ऑर्डर आणि पेमेंट मिळवण्यासाठी लाच दिली. स्थानिक मंडळांच्या अहवालानुसार, एकूण लाचेपैकी ७५ टक्के रक्कम कायदेशीर, वजन व मापे, अन्न, औषध, आरोग्य आदी सरकारी विभागातील अधिकाऱ्यांना देण्यात आली. अनेक व्यावसायिकांनी जीएसटी अधिकारी, प्रदूषण विभाग, महापालिका आणि विद्युत विभाग यांना लाच दिल्याची माहितीही तपास अहवालात दिली आहे. गेल्या १२ महिन्यांत ५४ टक्के कंपन्यांनी लाच दिली. लाचेचा हा प्रकार खंडणीसारखा आहे. सरकारी यंत्रणांशी व्यवहार करताना कंपन्यांचे काम जाणीवपूर्वक बंद करून लाच घेऊनच फाइल मंजूर केली जाते. यामुळे सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याने सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार कमी झालेला नाही. सीसीटीव्हीपासून दूर, बंद दाराआड लाच दिली जाते, असा या सर्वेक्षणाचा दावा आहे.

अहवालात म्हटले आहे की, जरी सरकारी ई-प्रोक्योरमेंट मार्केटप्लेससारखे उपक्रम भ्रष्टाचार कमी करण्यासाठी चांगले पाऊल असले तरी सरकारी विभागांमध्ये लाचखोरीचे अन्य अनेक मार्ग खुले आहेत. ताज्या सर्वेक्षणात १८ हजार व्यावसायिकांच्या प्रतिसादांचा समावेश होता. देशातील १५९ जिल्ह्यांमध्ये हे सर्वेक्षण करण्यात आले. व्यवसायांनी पुरवठादार म्हणून पात्र होण्यासाठी, सुरक्षित कोटेशन आणि ऑर्डर मिळवण्यासाठी, तसेच पेमेंट गोळा करण्यासाठी गेल्या १२ महिन्यांत विविध संस्थांना लाच दिल्याचे मान्य केले आहे. हे सर्वेक्षण २२ मे ते ३० नोव्हेंबर २०२४ दरम्यान करण्यात आले. सर्वेक्षणात सहभागी व्यावसायिक कंपन्यांनी सांगितले की, ७५ टक्के लाच कायदेशीर, मेट्रोलॉजी, अन्न, औषध, आरोग्य आदी विभागांच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. सरकारी खात्यांना लाच देणाऱ्या व्यावसायिकांची टक्केवारी सुद्धा मोठी आहे. कायदेशीर, वजन आणि मापे, अन्न, औषध आणि आरोग्य विभाग, कामगार आणि पीएफ विभाग, मालमत्ता आणि जमीन नोंदणी, जीएसटी अधिकारी, प्रदूषण विभाग, महानगरपालिका, आयकर, अग्निशमन, पोलीस, वाहतूक, वीज, अबकारी अशा विभागात सर्वाधिक लाच द्यावे लागत असल्याचे यातून समोर आले आहे. ही खूप मोठी पातळी असून, स्थानिक पातळीवर तर परिस्थिती आणखी बिकट आहे. वीज जोडणीसाठी अर्ज केल्यास या कामासाठी वीज निरीक्षकाला लाच द्यावी लागते.

इलेक्ट्रिकल फिटिंग तुम्ही कोणाकडूनही करून घेऊ शकता, परंतु विद्युत विभागाच्या अधिकृत कंत्राटदाराकडून इलेक्ट्रिकल फिटिंगचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्वतःचे कंत्राटदार नेमले आहेत. अग्निसुरक्षेची सर्व कामे ते करतात. त्यानंतरही एनओसीसाठी लाखो रुपये आकारले जातात. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बांधकामांसाठी ४५ ते ५५ टक्के कमिशन आकारले जात आहे. केंद्र आणि राज्य सरकारचे आदेश आहेत की सरकारी खरेदी ही जेम पोर्टलद्वारे करावी. यातूनही नोकरशाहीने पळवाट शोधली आहे. भ्रष्टाचार रोखण्यासाठी सरकार नंतर आदेश काढते. अधिकारी आणि पुरवठादार आधी मार्ग काढतात.

एकंदरीत पाहता भ्रष्टाचाराचा सर्वव्यापी विळखा अद्यापही कमी झालेला नाही. त्यामुळेच तपास यंत्रणांच्या धाडींमध्ये हजारो कोटींची माया सरकारी अधिकाऱ्यांकडे सापडताना दिसते. या अहवालातून समोर आलेले वास्तव हे सहभागी झालेल्यांच्या माहितीवर आधारित आहे. प्रत्यक्षात त्याचे रूप अधिक भीषण आहे. सरकारे बदलली, सत्तांची उलथापालथ झाली; पण भ्रष्टाचार आजही कायम आहे जो देशासाठी घातक आहे.

## 'मिडिया हाऊस'मधून पौष्टिक मिळावं..

# मराठी पत्रकार दिनाचे दर्पण...



***समाजाचे प्रबोधन करण्यासाठी बाळशास्त्री जांभेकर यांनी सहा जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू केले होते, त्यांचे स्मरण म्हणून ''दर्पण दिन'' साजरा केला जातो,ते मराठी पत्रकारितेचे जनक म्हणूनही ''मराठी पत्रकार दिन'' साजरा होत असतो, बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण चा उपयोग लोकांना सामाजिक सुधारणा , जागृती करण्यासाठीचे व्यासपीठ म्हणून केला.***

माझी दहावी १९८४ ला झाली. माजलगाव श्री सिध्दश्वर शाळेतच लिखाणाची आवड जोपासलेली होती, पुढे संभाजीनगरला शिक्षणासाठी म्हणून राहिलो त्या काळात'' दैनिक अजिंठा'' कार्यालयात ये - जा राहिली होती आणि तेव्हाच वृत्तपत्र क्षेत्राचे आकर्षण होते, काही काळ व्यवसायात मन घातले पण ओढ बातमीदारीची होती , माजलगावी दैनिक अजिंठा चा वार्ताहर म्हणून काम करण्याची संधी मिळवली आणि मन रमत गेले. चार-पाच वर्ष वार्ताहर म्हणून कामाचा अनुभव घेत असतानाच पूर्णवेळ पत्रकारिता (नोकरी) करण्याची संधी प्राप्त झाली. मा. सर्वोत्तम गावस्कर अण्णा, यांचे मार्गदर्शनाने सुरुवात चांगली झाली. संघ संस्कारात वाढल्याने विचाराचे व्यासपीठ म्हणून ''तरुण भारत'' बद्दलचे प्रेम आणि संधी मिळाली . दिलीपजी धारूरकर, युधिष्ठिर जोशी, मनोहरराव कुलकर्णी , अरविंदराव पोतनीस प्रभाकरराव कुलथे,प्रा. रामेश्वरजी बद्दर, अशा ज्येष्ठ संपादक मंडळीचा सहवास, मार्गदर्शन मिळाले आहे .

समाजासाठी सकारात्मक, जागृतीसाठीची बातमीदारी करत आज वयाचे ५६ वर्ष सुरू असताना तीन तप (३६वर्ष) पत्रकारितेचे देखील पूर्ण झाले, या काळाचे स्मरण चित्रफित आज दर्पण दिनाच्या निमित्ताने अवलोकन केली असता एक समाधानाची पावती मिळते आहे. आज पत्रकारिता, बातमीदार, संपादक याचे या सात्विकते चे रूपांतर ''मीडिया'' या नवीन फास्ट फूड मध्ये झाले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि सोशल मीडिया, युट्युब, चॅनेल फेसबुक, इन्स्टा, ट्विटर या मीडियाच्या फास्टफुड डिशने समाजाची प्रकृती बिघडते आहे असेच बोलले- ऐकले जाते आहे. याची दुसरी चांगली बाजू पण मीडियाच्या वार रूममध्ये आहेत पण त्याकडे मुद्दामहून पहावे लागते. उघड्यावरची आंघोळ करणारे आणि ती पाहणे याचे प्रमाण वाढते आहे. निर्बंध नाहीत, निर्बंध घालनेही अवघड आहे. काय पाहावे ? काय बोलावे ? काय ऐकावे ? याचे संस्कार करून घेणे अवघड आहे.

वृत्तपत्र हे समाजमन घडवण्याचे माध्यम आहे, या कामात पत्रकार म्हणून आम्ही जे कार्य केलं त्याचं समाधान आज मोठं आहे. आज सगळं बिघडला आहे हे पण तेवढं सत्य नाही. चांगलं तेच समाजासमोर येण्यासाठी ''दर्पण ''म्हणून मीडियात देखील काम करणारे आहेत. प्रकृती बिघडणार आहे हे कळत असून देखील सात्विक न घेता फास्ट फूड घेणारे आणि ते उपलब्ध करून देणारे प्रतिष्ठाने -दुकाने वाढतात, या विरुद्ध समाजमन तयार करण्यासाठी आता समाजानेच ठरवले पाहिजे.

आजच्या दर्पण दिनाच्या निमित्ताने वळून पाहण्याबरोबर आजची स्थिती आणि भविष्याच्या सुदृढ देशाच्या वाटचालीत जे- जे चांगलं आहे त्याची पाठराखण, अपायकारक ते बाजूला सारून, चांगलं उगवण्यासाठीची पेरणी -रुजवन करण्यासाठीचा '' मिडीया हाऊस मधून देखील'' पौष्टिक आहार यासाठीचा संकल्प मीडियाकर्मित आणि समाज मनात तयार व्हावं एवढीच अपेक्षा.

प्रिंट मीडिया, वृत्तपत्र, साहित्य वाचनाची आवड या संस्काराची रुजवन, जोपासना आणि याच्या वृद्धीसाठी सर्वांनी मिळून या आघाडीवर काम करावं ,सरकारी धोरणात देखील याला प्राधान्य क्रमांकावर पाठबळ मिळावे एवढी अपेक्षा वावगी नसावी..


**प्रमोद कुलकर्णी**
**पत्रकार बीड मो. ९४०३९०४६५१**

## दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर...



***६ जानेवारी १८३२ रोजी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठीतील पहिले नियतकालिक सुरू करून मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया घातला.या घटनेला आता १९३ वर्षे पूर्ण झाली आहेत. ६ जानेवारीला दर्पण सुरू झाले.या दिनाचे स्मरण म्हणून महाराष्ट्रात ६ जानेवारी हा दिवस दर्पण दिन किंवा पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो..***

अनेकांचा समज असा आहे की, ६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्मदिन आहे म्हणून तो पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो.. हे चुकीचं आहे.. बाळशास्त्रीं जांभेकर यांचा जन्म २० फेब्रुवारी १८१२ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोंभुर्ले येथे झाला आहे.. मृत्यू १७ मे १८४६ रोजी झाला आहे.. तीन वर्षांपुर्वी महाराष्ट्र सरकारने बाळशास्त्री जांभेकर यांचा राज्यातील महनिय व्यक्तींच्या यादीत समावेश केला आहे.. त्यावेळेस अनेक कागदपत्रे धुंडाळून आणि इतिहास तज्ज्ञांशी चर्चा करून महाराष्ट्र सरकारने २० फेब्रुवारी १८१२ रोजी आचार्य बाळशास्त्री यांचा जन्म झाल्याचे जाहीर केले.. तसे परिपत्रक (जीआर) देखील काढला गेला.. राज्यातील शासकीय कार्यालयात २० फेब्रुवारी रोजी बाळशास्त्रींची जयंती साजरी केली जाते...या संदर्भात गुगलवरील चुकीच्या माहितीचा अनेकजण आधार घेतात.. गुगलवर ६ जानेवारी रोजी बाळशास्त्रींचा जन्म झाल्याचे म्हटले आहे, ते धादांत चुकीचे आहे. फोटोच्या संदर्भातही असाच संभ्रम आहे.. गुगलवर बाळशास्त्रींचे चार वेगवेगळे फोटो आहेत.. मात्र यापैकी केवळ वर दिलेला फोटो हाच योग्य वाटतो.. कारण बाळशास्त्रींचे निधन वयाच्या ३४ व्या वर्षी झाले.. म्हणजे ते तरूणपणी गेले.. प्रकांड पंडित, भाषा प्रभू असलेल्या बाळशास्त्रींच्या चेहऱ्यावर त्यांच्या विद्वत्तेचे तेज विलसत होते.. शिवाय ते नियमित व्यायाम करायचे त्यामुळे शरीरयष्टी बऱ्यापैकी चांगली होती.. बरं ते फार काळ आजारी होते असंही नाही.. किरकोळ ताप आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले.. परंतू जे फोटो गुगलवर दिसतात त्यात बाळशास्त्री ७० वर्षांचे, खंगलेले दिसतात.. असं नाही.. मराठी पत्रकार परिषदेनं या सर्व गोष्टींचा विचार करून मुकुंद बहुलेकर या चित्रकाराकडून हे छायाचित्र बनवून घेतले.. १९९९ मध्ये या चित्राचे अनावरण पुण्यातील बालगंधर्व मध्ये स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.. यावेळी बोलताना बाळासाहेब ठाकरे यांनी हेच खरे बाळशास्त्री असे सांगत चित्रकार बहुलेकर यांचा सत्कारही केला होता. ही सारी वस्तुस्थिती लक्षात घेऊन पत्रकार दिन साजरा करताना दोन पथ्ये पाळावीत. ६ जानेवारी हा बाळशास्त्रींचा जन्मदिन नाही हे लक्षात असू द्यावे आणि कार्यक्रमात वर असलेला फोटो वापरावा..चुकीचा फोटो आणि चुकीची माहिती करू नये ही विनंती.



**एस.एम.देशमुख**

## ४४ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. भीमराव वाघचौरे

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

४४ व्या व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कादंबरीकार डॉ. भीमराव वाघचौरे यांची एकमताने निवड करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर येथे रविवारी मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

बैठकीस मसापचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले-पाटील, उपाध्यक्ष डॉ. आसाराम लोमटे, रामचंद्र तिरूके, कार्यवाह डॉ. दादा गोरे, कोषाध्यक्ष डॉ. रामचंद्र काळुंखे, सहकार्यवाह डॉ. गणेश मोहिते, डॉ. दीपा क्षीरसागर, कार्यकारिणी सदस्य कुंडलिक अतकरे, प्रा. किरण सगर, दगडू लोमटे, देविदास फुलारी, डॉ. हेमलता पाटील, प्रा. संतोष तांबे, डॉ. ऋषीकेश कांबळे, सहकार्यवाह डॉ.गणेश मोहिते आदी उपस्थित होते. यंदा ४४ वे मराठवाडा साहित्य संमेलन १५ व १६ फेब्रुवारी रोजी वाळूज, बजाजनगर येथील विजय शिक्षण प्रसारक मंडळाचे दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात होणार आहे. संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. भीमराव वाघचौरे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या विनायकराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय, वैजापूर येथे प्राध्यापक म्हणून सेवा देऊन निवृत्त झाले आहेत. त्यांच्या नऊ कादंबऱ्या 'रानखळगी', 'पाणघळी', 'गराडा', 'अंगारकूस', 'नवं काटवन', 'पिंडीवरचे विंचू', 'किंजाळकाटे', 'जखडण', 'घरंगळण' व दोन कथासंग्रह 'मरणावळ', 'मूठमाती' आणि एक समीक्षग्रंथ 'रा. रं. बोराडे यांचे साहित्य' इत्यादी ग्रंथ प्रकाशित आहे. या लेखनासाठी त्यांना विविध साहित्य संस्थाचे पुरस्कार प्राप्त आहेत. डॉ. वाघचौरे यांच्या दीर्घ कादंबरी व कथालेखनाचा विचार करून या संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची मसापने एकमताने निवड केली आहे. बैठकीस डॉ. संजीवनी तडेगावकर, अनंत कराड, प्रा. जयद्रथ जाधव, सरोज देशपांडे, संजीव कुलकर्णी,सुभाष कोळकर, नामदेव वाबळे, विलास सिंदगीकर, डॉ. समिता जाधव, नितीन तावडे, श्रीधर नांदेडकर, डॉ. हंसराज जाधव, डॉ. दिलीप बिरुटे, प्रभाकर साळेगावकर, मोहिब कादरी आदी सदस्य उपस्थित होते.

## त्रिदल सैनिक सेवा संघाचे छोटेशे रोपटे आता वटवृक्ष झालाय-श्याम धस

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी सारख्या एका छोट्या शहरातून त्रिदल सेवा संघ या संघटनेचे छोटेसे रोपटे लावले सैनिकाच्या अडीअडचणी सोडवत संघटनेने काम केले आहे.या संघटना आणखी मजबूत करत त्याचा राज्यभरात वटवृक्ष करण्याचे काम या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अंकुश खोटे यांनी केले असल्याचे प्रतिपादन युवा नेते श्याम धस यांनी केले आहे.**




ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते तर आमची संघटना वाढण्याकरता आम्हाला कुठेतरी एका मोठ्या राजकीय वरद हस्ताची म्हणजे पाठीराख्याची गरज होती ती आता कणखर नेतृत्व आ.सुरेश धस पूर्ण झाले आहे त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये आमची संघटना मजबूत करून आम्ही दाखवून देऊ आम्ही पळणारे नाहीतर लढणारे आहोत संघटनेसाठी पुढच्या वर्धापनदिनापर्यंत महाराष्ट्रभर मोठे काम करु असे प्रतिपादन संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मेजर अंकुश खोटे यांनी आपल्या संघटनेच्या तिसऱ्या वर्धापनदिनी सैनिकांना संबंधित करताना केले. आष्टी येथे त्रिदल सैनिक सेवा संघ संघटनेचा तिसरा वर्धापन दिन रविवार दि.५ जानेवारी रोजी कृष्णा हॉटेल येथे प्रमुख मान्यवर व महाराष्ट्रातुन आजी माजी सैनिक यांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखदार सोहळ्यात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष युवा नेते श्याम धस होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अंकुश खोटे,उपाध्यक्ष महादेव खेडकर,उपाध्यक्ष जमीर पठाण,उपाध्यक्ष संजीव फसले, आष्टी तालुकाध्यक्ष नवनाथ भगत,बीड जिल्हाध्यक्ष महादेव बांगर,संजय म्हस्के, सातारा जिल्हाध्यक्ष दत्ता माळी,पुणे जिल्हाध्यक्ष परशुराम शिंदे,करमाळा तालुकाध्यक्ष अरकुर शिंदे,श्रीगोंदा तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण,रावसाहेब शिंदे,प्रवीण कदम,मधुकर साळवे,रामराव तांबे, दत्ता शिंनगारे,बबन पवार, अशोक जायभाय, शेख,हनुमंत सानप आदी उपस्थित होते. यावेळी ह.भ.प. गोविंद महाराज जगताप यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले, सैनिकांच्या अन्याय विरोधात लढा द्या, आमच्या समस्या सोडा,आपल्या तालुक्यात सर्व विभागाच्या कार्यालयात अनेक समस्या आहेत.अधिकारी हे सर्वसामान्यांच्या कामासाठी आढेवेढे घेतात.त्रिदल सेवा संघ या संघटनेचे नाव देशात गाजले पाहिजे. सैनिकाच्या अडीअडचणी सोडवण्याचे प्रामाणिकपणे ही संघटना काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी राज्याच्या कोनाकोऱ्यातून तसेच आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्यातील त्रिदल आजी माजी सैनिक सेवा संघ यांच्यासह पदाधिकारी,आजी-माजी सैनिक,वीरमाता,वीर पत्नी,तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार संस्थापक अध्यक्ष अंकुश खोटे फौजी यांनी मानले.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते भारतातील सर्वात जलद नमो भारत रेल्वेचे उद्घाटन

नवी दिल्ली। वृतसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी दिल्लीतील नमो भारत या भारतातील सर्वात जलद रेल्वेच्या साहिबाबाद आणि न्यू अशोक नगर दरम्यान दिल्ली-गाझियाबाद-मेरठ नमो भारत कॉरिडॉरच्या १३ किमी लांबीच्या भागाचे उद्घाटन केले. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी युपीआय द्वारे तिकीट काढून रेल्वेतून प्रवास केला. प्रवासादरम्यान मोदींनी विद्यार्थ्यांशी संवादही साधला. पंतप्रधान मोदी यांनी रविवारी दिल्लीत १२ हजार २०० कोटी रुपये किमतीच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. तत्पूर्वी, गाझियाबादमधील साहिबाबाद आणि दिल्लीतील न्यू अशोक नगर दरम्यान नमो भारत रेल्वेच्या दिल्ली विभागाचे उद्घाटन केले.

## पान १ वरून...

पान १ वरून...

### लाडक्या बहिणींवर

लाभार्थ्यांची पडताळणी केली जाणार आहे, पण सरसकट स्क्रुटीनी होणार नाही. स्थानिक प्रशासनाकडून ज्या तक्रारी येतील त्यांच्यावर कारवाई होईल. चार चाकी गाड्या असणाऱ्या लाभधारकांना आता या योजनेचा लाभ मिळणार नाही. ज्यांजे उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा कमी आहे, त्यांची स्क्रुटीनी होण्याचा विषयच नाही, असेही तटकरे यांनी म्हटले. आपण क्रॉस व्हेरिफिकेशन करणार आहोत, ६० ते ७० टक्के लोक असे आहेत जे पिवळे आणि केशरी कार्डधारक आहेत, त्यांचे उत्पन्न अडीच लाखापेक्षा कमी आहे. ते या स्क्रुटीनीच्या निकषात नाहीत. ज्यांचे आधारकार्ड आणि बँक खाते नंबर मॅच होत आहे, ते देखील स्क्रुटीनीमध्ये येणार नाहीत. कारण, त्यांचे उत्पन्न किती आहे हे आपल्या लक्षात आलेले आहे, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली. यावर शरद पवार राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी म्हटले आहे की, लाडक्या बहिणींचे पैसे बंद होता कामा नयेत. लाडक्या बहिणींनी स्वत: लाईनमध्ये उभा राहून अर्ज भरले आहेत. त्यांना थांबवणे योग्य नाही. जे काही निकष लावायचे आहेत, ते नव्याने अर्ज करणाऱ्या इथून पुढच्या लाडक्या बहिणींसाठी लावावेत. मात्र ज्यांना हे हप्ते मिळत आहेत त्याच्यात कोणताही अडथळा आणू नये, असे पाटील यांनी म्हटले आहे.

----------

### नोंदणी झाली मात्र

केंद्राकडे नोंदणी केलेले शेतकरी आपला नंबर कधी येणार हे पाहण्यासाठी चकरा मारत आहेत. दुसरीकडे गेल्या वर्षभरापासून सोयाबीन हमीभावावरून नाराज शेतकऱ्यांना आता खरेदी केंद्रांवरही अडचणीच असल्याचे समोर येत आहे. बारदाना तुटवड्याने राज्यातील अनेक सरकारी सोयाबीन खरेदी केंद्रच ठप्प असून शासकीय सोयाबीन खरेदी केंद्रचालकांनाही ही खरेदी पूर्वपदावर कधी येणार याबाबत कल्पना नसल्याचे समोर आले आहे. सरकारी सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी, लोकप्रतिनिधी यांची मागणी लक्षात घेता सोयाबीन खरेदी नोंदणीची मुदत ६ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वीच्या निर्णयानुसार ही मुदत ३१ डिसेंबरपर्यंत होती. नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी नाफेड आणि एनसीसीएफ यांच्यामार्फत १२ जानेवारीपर्यंत केली जाणार आहे, अशी महिती देखील पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. आतापर्यंत सोयाबीनची साधारणपणे चार लाख मेट्रिक टन एव्हढी विक्रमी खरेदी झाली असल्याचे सांगण्यात येत आहे. मागील वर्षी केवळ ७ हजार ४०० क्विंटल एवढी खरेदी झाली होती. यावर्षी शेतकऱ्यांना एक हजार कोटी रुपये मोबदला देण्यात आला आहे. राज्यात सध्या ५६१ खरेदी केंद्र सुरू असून आतापर्यंत सुमारे ७ लाख शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

--------------

### मुंडेंच्या बंगल्यावर जूनमध्येच

मार्फत कंपनीशी संधान साधण्याचा प्रयत्न झाला. वाल्मिक कराड यांनी बिक्कड यांना सांगून दुसऱ्या कंपनीचे काम बंद पाडले. १९ जून रोजी सातपुडा या बंगल्यावर बैठक झाली, ३ कोटी रुपयांची मागणी झाली नंतर कंपनी दोन कोटी रुपयांना राजी झाली. ओम साई राम या कंपनीच्या नावावर सिक्युरिटी देण्यात आली. नितीन बिक्कड याला उचलले तर बऱ्याच गोष्टी बाहेर येतील, असे सुरेश धस यांनी म्हटले आहे. दरम्यान दुसरीकडे बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी देखील यावेली बोलताना जोरदार हल्लाबोल केला आहे. ९ तारखेला अपहरण करून संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली, हा मोर्चा कुठल्याही पक्षाचा, जातीचा नाही. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी झाली पाहिजे. जोपर्यंत फाशी होत नाही तोपर्यंत मोर्चा सुरूच राहणार असा इशारा बजरंग सोनवणे यांनी दिला आहे.

---------------

### धनंजय मुंडे शहाणा हो, नाही

आमच्या जिव्हारी लागला आहे. अजून बोललो नाही पण आता मी थेट मुख्यमंत्र्यांना बोलणार आहे. तुमच्या सरकारमध्ये राहून याला जातीय तेढ निर्माण करायचा आहे, असे जरांगे म्हणाले. मुख्यमंत्र्याच्या शब्दावरती मराठे शांत आहेत. हे लोक आम्हाला खूप त्रास देत आहेत. एकही आरोपी सुटला तर मुख्यमंत्र्यांनी मराठ्यांना धोका दिला असा संदेश जाईल. त्यामुळे सर्वांना शिक्षा द्या.आरोपी पुण्यातच कसे सापडत आहेत? हे इकडे पळून आले आहेत. मुंडेंनी हे सगळे थांबवावे, असे ते म्हणाले. लक्ष्मण हाकेंना मी कधीही विरोधक मानलं नाही. मी त्यांच्या कुठल्याच जातीवर बोललो नाही, असे जरांगे म्हणाले.

--------

### देशमुख खून प्रकरणातील आरोपींचे

आणि सुधीर सांगळे यांना पुण्यातून अटक केल्यावर ते आतापर्यंत नेमके कुठे राहीले?, त्यांना मदत कोणी केली? असे बरेच प्रश्न उपस्थित झाले होते. आता याचे उत्तर मिळाले असून आरोपींचे गुजरात कनेक्शन उघड झाले आहे. संतोष देशमुख यांचा खून केल्यानंतर हे तीनही आरोपी भिवंडीमार्गे गुजरातला गेले होते. ११ डिसेंबरला भिवंडीतून गायब झाल्यानंतर या आरोपीनी गुजरात गाठले होते. गुजरातच्या टेकडीवर असलेल्या प्रसिद्ध अशा गिरनार मंदिरात आरोपींनी १५ दिवस मुक्काम केला होता. गिरनार मंदिराला जवळपास ११ हजार पायऱ्या आहेत. हे मंदिर प्रसिद्ध आहे. याच मंदिरात आरोपींची खाण्यापिण्याची आणि राहण्याची व्यवस्था झाली. त्यांच्याजवळचे पैसे संपल्याने ते पुन्हा पुण्याला परतले. पैशासाठी केजला त्यांनी फोन केला आणि त्यातच ते अडकले. पुण्यातून त्यांना पोलिसांनी अटक केले असून सध्या ते कोठडीत आहेत.

----------

### मुंडे बहिण-भावांच्या

दमानिया पुढे म्हणाल्या, मी दोन विधानं केली होती. बीडमध्ये उच्च पदांवर वंजारी समाजाचे लोक आहेत असे बोलले होते. गोपानाथ मुंडेंच्या काळापासून हे होत आले होते. बीडमध्ये त्यांना बोलवण्यात आले होते. त्यात कोणत्याही प्रकारे जाती समाजाविरोधात बोलले नाही. ट्विटरवर स्पष्ट करण्यासाठी मी दोन मुद्दे टाकले, असे अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे. भगवान बाबा नेहमीच वंदनीय आणि आदरणीय आहेत. समाज कष्टाळू, आळशी आहे असे मी कुठेही म्हटले नाही. समाजाला हा प्रकार चुकीच्या पद्धतीने सांगण्याचे काम केले गेले. सानप मुंडेसारखे उच्च पदावरील माणसं परळीतच का? यासंदर्भात मी बोलले आणि ते लिहीले देखील होते आणि दाखवले होते. वंजारी समाजाचा वापर धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्याकडून होतोय यात शंका नाही, असेही अंजली दामनीया म्हणाल्या आहेत. आपल्याला मुंडे समर्थकांकडून त्रास दिला जात असल्याचा आरोपही दमानिया यांनी केला. अख्खी फौज माझ्यामागे लावण्यात आली, असा आरोप करताना अंजली दमानियांनी काही नावं घेतली. माझा स्कूबा डायव्हिंगचा फोटो टाकला आणि त्यावर अश्लील, आक्षेपार्ह बोलले, असा आरोप अंजली दमानियांनी मुंडे समर्थकांवर केला. तसेच सुनिल फड या व्यक्तीचे नाव घेत त्याचा धनंजय मुंडेंबरोबर फोटो असल्याचे दमानिया यांनी पत्रकारांना दाखवले. माझ्यासंदर्भात अत्यंत घाणेरड्या आणि अश्लील भाषेत माझ्याबद्दल लिहिले गेले अशा आरोप अंजली दमानियांनी केला आहे. याबाबत आपण रश्मी शुक्ला यांच्यासह मुख्यमंत्र्यांना मॅसेज केले आहेत. पण त्याला उत्तर मिळाले नसल्याचे दमानिया म्हणाल्या.

**या कार्यकर्त्यांची थेट नावं घेतली**

मला त्रास देणारे सगळे पंकजा (मुंडे) आणि धनंजय मुंडे यांचे कार्यकर्ते आहेत. पंकजा मुंडे यांचा कार्यकर्ता असलेल्या संभाजी चौरेंनी पण कॉल केला. मोहन आघाव यांनी मला परत परत कॉल केले. सुनिल फड याच्यासह या प्रत्येक माणसावर गुन्हा नोंदवला पाहिजे, अशी मागणी अंजली दमानियांनी केली आहे.

-----------

### संतोष देशमुख खून प्रकरणाचा

संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ निघत असलेल्या मोर्चासंदर्भात फडणवीसांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर बोलताना, मोर्चा काढण्याचा अधिकार आहे. बीड प्रकरणात सरकार आणि पोलीस पूर्ण शक्तीने कारवाई करत आहेत कोणालाही वाचवले जाणार नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने दादागिरी, हप्ते वसुली करतात त्या सगळ्यांवर जरब बसवणार, असेही फडणवीस म्हणाले. सरपंच हत्या प्रकरणाच्या गुजरात कनेक्शनबद्दल पत्रकारांनी फडणवीसांना प्रश्न विचारला. या प्रश्नावर फडणवीसांनी, (आरोपी) कुठेही गेले असतील आणि कोणी त्यांना मदत केली असेल त्यांच्यावर कारवाई होत आहे. मदत करणाऱ्यांनाही आम्ही सोडत नाही. यासंदर्भात नीट चौकशी करू द्यावी. सगळी चौकशी पूर्ण होऊ द्यावी. आम्ही कोणालाही सोडणार नाही. याचा उपयोग राजकारणाकरता करू नये, ही अतिशय गंभीर बाब आहे, असे उत्तर दिले. हत्येचा उपयोग राजकारणाकरता होऊ नये तर त्याच्यातून समाजात काही सुधारणा व्हावी, अशी इच्छाही फडणवीसांनी बोलून दाखवली.

**दमानियांनी पोलिसात तक्रार द्यावी**

अंजली दमानिया यांनी पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे समर्थकांकडून आपल्याला धमकावले जात असल्याचा आरोप केल्यासंदर्भात फडणवीसांनी पहिली प्रतिक्रिया नोंदवली आहे. अंजली दमानिया यांची काही तक्रार असेल ती त्यांनी पोलिसांना द्यावी, पोलीस त्याच्यावर कारवाई करतील, असे आश्वासन फडणवीसांनी दिले आहे.

---------

### वंजारी समाज आक्रमक;

संतोष देशमुख खून प्रकरणी परभणीत आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मनोज जरांगे पाटील यांनी परळी किंवा बीड जिल्ह्यातील मराठा बांधवांना धक्का लागला तरी अलिकडून परभणी आणि पलीकडून धाराशिव आहे. यांना घरात घुसून घुसून हाणा, अशी भाषा वापरली. त्याबरोबरच मंत्री धनंजय मुंडे यांना एकेरी भाषेत महाराष्ट्राच्या रस्त्यावर फिरु देणार नाही, असा इशारा दिला होते. तसेच सुरेश धस यांनी सुध्दा दोन समाजात तेढ निर्माण करणारे वक्तव्य केले. धस आणि जरांगे यांनी दोन समाजात तेढ निर्माण करणारे वक्तव्य केले असून वंजारी समाजाला एकप्रकारे धमकी दिली असल्याचे म्हणत वंजारी समाजाच्या नागरीकांनी बीडमधील शिवाजी नगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. मात्र गुन्हा नोंदवून घेण्यास पोलिसांकडून टाळाटाळ करण्यात आली. त्यामुळे वंजारी समाज आक्रमक झाला असून जोपर्यंत धस आणि जरांगे यांच्यावर गुन्हा नोंद होत नाही तोपर्यंत आम्ही पोलिस ठाण्यात ठिय्या आंदोलन करणार असल्याची भुमिका वंजारी समाजाने घेतली आहे.

---------------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि.०६ जानेवारी २०२५




माजलगाव : येथे मल्हार सेना प्रणित राजे मल्हारराव होळकर दिनदर्शिकाचे प्रकाशन करण्यात आले यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, शिवसेना तालुका प्रमुख तुकाराम येवले, मा. जि. प. सदस्य बबनराव सरवदे, भाजपा तालुका अध्यक्ष अरुणराव राऊत, ओबीसी नेते यशवंत गायके, भाजपा नेते ज्ञानेश्वर सरवदे, मल्हार सेनेचे आशोकराव डोणे, ओबीसी नेते लक्ष्यमण गायकवाड, पत्रकार कमलेस जाब्रस, दिनकर शिंदे, नारायण सातपुते, युवा नेते रोहीत वगरे, ओबीसी महासंघाचे जिल्हा अध्यक्ष विलास नेमाणे, युवा नेते रामेश्वर गवळी, पत्रकार पुरुषोत्तम करवा, ओबीसी महासंघाचे तालुका अध्यक्ष श्यामसुंदर पांचाळ, दत्ता येवले

# जिल्हा पत्रकार भवनातला पहिला पत्रकार दिन उत्साहात साजरा होणार

सातारा । प्रतिनिधी

मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ६ जानेवारी हा 'पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो. यंदाचा पत्रकार दिन साताऱ्यातील जिल्हा पत्रकार भवनाच्या इमारतीत प्रथमच मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.



गोडोली येथील जिल्हा पत्रकार भवनात सोमवारी दि.६ जानेवारीला सकाळी ११.३० वाजता हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरिष पाटणे भूषविणार आहेत. यावेळी सातारा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष विनोद कुलकर्णी, प्रभारी उपसंचालक माहिती वर्षा पाटोळे, सातारा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अभिजीत बापट तसेच सातारा पत्रकार संघाचे अध्यक्ष विठ्ठल हेंद्रे यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन सातारा पत्रकार संघ, सातारा जिल्हा पत्रकार संघ, डिजिटल मीडिया परिषद, जिल्हा माहिती कार्यालय, आणि सातारा इलेक्ट्रॉनिक मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने केले आहे, अशी माहिती सातारा पत्रकार संघाचे अध्यक्ष विठ्ठल हेंद्रे आणि कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर भोईटे यांनी दिली. कार्यक्रमात दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करण्यात येईल. मान्यवरांचा सत्कार होऊन, त्यांचे मनोगत सादर केले जाणार आहे. जिल्ह्यातील पत्रकार आणि छायाचित्रकार यांना एकत्र येण्यासाठी आणि पत्रकारितेतील योगदानाचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## बीड तालुक्यातील 'लाडके भाऊ' पगाराविना; ट्रेनी शिक्षकांचे मानधन आठवडाभरात द्या –गुंदेकर

बीड प्रतिनिधी

**तालुक्यातील ४२७ ट्रेनी शिक्षकांची पगार त्यांच्या निवडीच्या कालावधी पासून ते आजपर्यंत देत असलेल्या ४ महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण होऊनही झालेली नाही. याबद्दल पाठपुरावा करूनही ट्रेनी शिक्षकांना पगार होत नसल्याने काल जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना निवेदन देत याबद्दल धनंजय गुंदेकर यांच्या नेतृत्वाखाली मागणी करण्यात आली. यावेळी तालुक्यातील शेकडो ट्रेनी शिक्षक उपस्थित होते.**



काल दिनांक ३ जानेवारी रोजी तालुक्यातील लाडके भाऊ म्हणजेच ट्रेनी शिक्षकांनी धनंजय गुंदेकर यांच्या नेतृत्वाखाली एकत्रित येत गटविकास अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी व कौशल्य विकास विभागला निवेदन देत थकलेल्या पगाराची मागणी केली. बीडचे गटशिक्षण अधिकारी खान यांच्या हलगर्जीपणामुळे फक्त बीड तालुक्यातील ट्रेनी शिक्षकांची पगार थकलेली असून याकडे सर्व वरिष्ठांनी लक्ष घालावे अशी विनंती यावेळी निवेदनाद्वारे करण्यात आली. आठवडाभरात या सर्व ४२७ ट्रेनी शिक्षकांचे मानधन द्यावे असे सामाजिक कार्यकर्ते धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे.

आ सुरेश अण्णांनी ट्रेनी शिक्षकांच्या पगाराचा प्रश्न सिईओंकडे मांडला

निवेदन देतेवोळी तेथे आलेल्या आ सुरेश अण्णा धस यांना ट्रेनी शिक्षकांनी आपल्या मागणीचे निवेदन दिले असता, त्यांनी थेट सिईओ यांच्याकडे सर्व ट्रेनी शिक्षकांना घेऊन जात हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली. आ धस यांच्या पाठपुराव्याला दखल घेत सिईओ यांनी तत्काळ पाठपुरावा सुरू केला. याबद्दल ट्रेनी शिक्षकांच्या वतीने आ सुरेश धस यांचे आभार मानण्यात आले.

## बब्रुवान शेंडगे यांची महाराष्ट्र राज्य अध्यात्म आणि वारकरी विभागाच्या अध्यक्षपदी निवड

बीड । प्रतिनिधी

विकासनामा प्रतिनिधी :- वडवणी तालुक्यातील मोरवड येथील जगद्गुरु तुकाराम महाराज अध्यात्मिक प्रतिष्ठान मोरवड चे संस्थापक अध्यक्ष बब्रुवान जगन्नाथ शेंडगे पाटील यांची अखिल भारतीय मराठा महासंघ मुंबई यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य अध्यात्म आणि वारकरी विभागाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली बहुजन समाज आणि मराठा समाज यांच्यात वाढत असलेली वैचारिक मतभेदाची दरी दूर करून आम्ही सारे पांडुरंगाचे वारकरी माऊलीच्या पालखीचे भोई हा विश्वास समाजात निरंतर वाढविण्यासाठी बब्रुवान



जगन्नाथ शेंडगे पाटील यांची निवड करण्यात आली या निवडीचे पत्र अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप दादा जगताप माजी केंद्रीय मंत्री माननीय जयसिंगरावजी गायकवाड पाटील श्री ह भ प फुरसुंगीकर महाराज श्री ह भ प बापूसाहेब महाराज देहूकर संतोष नानवटे राष्ट्रीय उपाध्यक्ष संभाजी राजे दहातोंडे राष्ट्रीय सरचिटणीस दशरथ पिसाळ राष्ट्रीय चिटणीस व संत महंत कीर्तनकार भागवताचार्य रामायणाचार्य आदी करून महाराज मंडळीच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले त्याबद्दल साप्ताहिक जनसामान्याचा विकासनामा वृत्तपत्राचे संपादक बालासाहेब फपाळ पाटील यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याबद्दल पत्रकार शेख आयेशा यांना सावित्रीमाई पुरस्काराने सन्मानित

बीड । प्रतिनिधी

**राष्ट्रमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल पत्रकार शेख आयेशा यांना सावित्रीमाई पुरस्काराने गौरविण्यात आले.**

तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन येथे दि. ४ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात ''स्त्री सन्मान सोहळा व मी सावित्री बोलतेय'' या एकपात्री विचारनाट्याचे बहारदार सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या मुख्य मार्गदर्शक व एकपात्री नाट्याच्या सादरकर्त्या एस.एन.डी.टी.महिला महाविद्यालय, जळगावच्या प्रा. मीनाक्षी वाघमारे उपस्थित होत्या.



कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. विनोद किर्दक, समर्थ राजयोग चे संपादक, मा. वैभव स्वामी, तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा, दीपाताई रोडे, सामाजिक कार्यकर्त्या वाघमारे ताई सह आदींची उपस्थिती होती.

या वेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला कर्तुत्वांचा सन्मान करताना प्रा.कल्याणी राजेश शिंदे (चित्रपट व फोटोग्राफी), भावना बिडवे (सौंदर्य प्रसाधन), मा. प्रज्ञा दीपक जमधाडे ( लॅक्मे- प्रोफेशनल मेकअप आर्टिस्ट, बीड. ), कु.अंकिता जाधव( फॅशन डिझायनर),मा. शेख आयेशा ( पत्रकारिता ) यांना सन्मानचिन्ह, धम्म सेवक लक्ष्मणराव रोडे गुरुजी ग्रंथ व पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. अंकुश कोरडे यांनी मानले. पत्रकार शेख आयेशा यांना सावित्रीमाई पुरस्काराने गौरविण्यात आल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पान ६ वरून...

### एक दिवस गेवराई

करत आहेत. रणवीर पंडित यांच्या परिश्रमातून या गेवराई तालुक्याचे नाव क्रीडा क्षेत्रात मोठे होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

गेवराई तालुक्याचे विद्यार्थी

देश पातळीवर खेळतील दत्तात्रय देशमुख

या प्रसंगी बोलताना पत्रकार दत्तात्रय देशमुख म्हणाले कि, ठरवलेले स्वप्न पाहायचे, ते यशस्वी होई पर्यंत त्याच्या मागे धावायचे आणि आपल्या भागातील विद्यार्थी खेळाडू राज्य आणि देश पातळीवर खेळवण्याचे मोठे काम रणवीर अमरसिंह पंडित यांनी केले आहे. त्यांनी क्रीडा क्षेत्रामध्ये स्वत:ला झोकून देऊन काम केले आहे. मोठ्या शहरामध्ये होणाऱ्या क्रीडा स्पर्धांनाही लाजवेल असे देखणे, नीट-नेटके, शिस्तबद्ध, आणि भव्य-दिव्य आयोजन हे या क्रीडा महोत्सवाचे वैशिष्ट्य आहे. या क्रीडा महोत्सवातून ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळाडू देश पातळीवर खेळतील आणि रणवीर अमरसिंह पंडित यांचे स्वप्न साकार होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

क्रीडा महोत्सवामध्ये बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ यावेळी करण्यात आले. या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शारदा विद्या मंदिच्या भव्य मैदानावर मुलींच्या गटामध्ये कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या. चार मैदानावर या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. कबड्डी स्पर्धेचे पंच म्हणून शुभम कादे, सिद्धू माने, रवींद्र राठोड, आकाश राठोड, गणेश यादव, ज्ञानेश्वर कापसे, प्रेम पवार, डॉ. प्रवीण शिलेदार यांनी काम पहिले. या कार्यक्रमात राज्य पातळीवर खेळलेल्या विद्यार्थी खेळाडू कोमल जाधव, गीता जाधव, आर्या पाटील, दिव्या राठोड ,श्रद्धा दाभाड आदींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासन अधिकारी प्रमोद गोरकर, प्रा. गोगुले काशिनाथ, मुख्याध्यापक राजेंद्र जगदाळे, मुरलीधर पवार, अशोक तौर, भक्तराज पौळ, वसंत राठोड, रणजीत सानप, उदय पाठक, सय्यद युनुस, भागवत राऊत, बबन पवार, विश्वनाथ पवार यांच्यासह शिक्षण संस्थेतील सर्व शाळेचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, क्रीडाप्रेमी नागरिक, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संखेने उपस्थित होते.

### एसपीसाहेब त्या चाळीस

बदलत असल्याने पुढार्यांना शस्त्राची गरज पडत आहे. त्याचप्रमाणे काही लोकांना शस्त्र आवश्यक देखील असतात. मात्र इतक्या प्रचंड शस्त्रांची गरज जिल्ह्यात का निर्माण झाली आहे ? हे देखील कळत नाही. एका शस्त्र परविण्यासाठी पाच लाखाचे वर खर्च येत असल्याची चर्चा आहे. यातील बराच पैसा प्रशासनाच्या बाहेर खंडणीखोरांच्या हातात जात असल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे नवीन शस्त्र परवाने देऊन समाजात दहशत मोजण्यासाठी प्रशासनाने हातभार लावू नये, अशी मागणी देशमुख यांनी केली आहे.

### तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी

काशी असणारे तीर्थक्षेत्र हरिहरेश्वर पाहून पोलादपूर या ठिकाणी मुक्कामास आली पोलादपूर या ठिकाणी पहाटे लवकर तयार होऊन महाबळेश्वर प्रतापगड पाहिला महाबळेश्वर मध्ये खरेदी करून म्याप्रो गार्डन हॉर्स रायडिंग वेंना लेक याचा आनंद विद्यार्थ्यांनी व सर्व शिक्षकांनी घेतला. चौथ्या दिवशी प्रति बालाजी केतकावळे येथे मुक्काम केला सकाळी उठून दर्शन घेऊन नारायणपूर एकमुखी दत्त मंदिरात दर्शन घेऊन सासवड सोपान काकांची समाधी चे दर्शन घेऊन जेजुरी खंडेराया या महाराष्ट्राचा आराध्य दैवत या ठिकाणी सर्व मुलांनी दर्शन घेऊन खरेदी केली त्यानंतर विद्येची देवता श्री गणराया मोरेश्वर यांचे दर्शन घेऊन त्या ठिकाणी भोजनाचा आनंद घेतला व परतीच्या प्रवासामध्ये पाटोदा मार्गे सहल तांदळवाडी या ठिकाणी येऊन सर्व विद्यार्थ्यांना जबाबदाऱ्यांनी सर्व शिक्षकांनी घरी सोडले पालकांनी सहल चांगली झाल्याबद्दल व यशस्वी झाल्याबद्दल खूप खूप समाधान व्यक्त केले मुख्याध्यापक श्री श्याम डाके सर यांनी सर्व शिक्षकांचे खूप चांगली कामगिरी केल्याबद्दल कौतुक केले व या प्रवासामध्ये गाडी चालवणारे जे आमचे सारथी होते महामंडळाने दिलेले ते म्हणजे उल्हास भड यांनी अतिशय चांगलं काम केले चांगली ड्रायव्हिंग करून विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाने रमले शिक्षकाची भूमिका त्यांनी पार पाडली त्याबद्दल त्यांचे सर्व पालकांनी सुद्धा श्री उल्हास बोड यांचे तोंड भरून कौतुक केले स्तरातून कौतुक होत आहे तसेच सर्वांनीच पालकासह सर्व शिक्षक विद्यार्थ्यांनी नवगण शिक्षण संस्थेचे सचिव उपाध्यक्ष डॉक्टर डॉ दीपाताई क्षीरसागर मॅडम व प्रशासक देशमाने सर्? गुट्टे सर यांचेही आभार व्यक्त केले शेवटी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये सहल संपन्न झाली.

-----------

## संविधान बचाव जन आक्रोश मोर्चास मोठ्या संख्येने उपस्थित रहा -भीमसैनिक प्रेम कांबळे

बीड । प्रतिनिधी

येथील सर्व दलित बहुजन समाजातील संघटना एकत्र येऊन दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी बीड येथे संविधान बचाव जन आक्रोश मोर्चा निघणार असून, या मोर्चात सर्व संघटनांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे



परभणी येथील शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्ये प्रकरणी संबंधित पोलिसांवर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात यावा, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान करणारे गृहमंत्री अमित शहा यांचे मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी, परभणी येथे महिलावर अमानुष लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, बीड येथील मसाजोग येथे सरपंच यांच्या मारेकर्यांना फाशीची शिक्षा व्हावी, देशातील सर्व निवडणुका मतपत्रिकेवर घेण्यात याव्यात शासकीय नोकरीतील गुत्तेदारी पद्धत रद्द करण्यात येऊन रिक्त असलेल्या राखीव विरोधी शक्ती संविधानाच्या विरोधात काम करत असून संविधान संपवण्याचा प्रयत्न करत आहेत. कायदेशीर दृष्ट्या हे शक्य नाही याची कल्पना त्यांना असताना सुद्धा घटना दुरुस्त्या करून संविधान कमकुवत करण्याचा प्रयत्न करत आहेत.

या सह देशात जाती धर्मात वाद लावुन राजकीय पोळी भाजण्याच काम जोरात सुरू झालेलं आहे. अश्यातच महाराष्ट्रात जिल्हा परभणी येथे जाणूनबुजून संविधान प्रतिमेची केलेली विटंबना तसेच शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा झालेला संशयास्पद मृत्यू व देशाच्या संसदे मध्ये गृहमंत्री अमित शाहा यांनी संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबत ऐकेरी भाषेत केलेले जाणीवपूर्वक विधान या सह केज तालुक्यातील मस्साजोग येथे मानवतेला काळीमा फासणारा सरपंच संतोष देशमुख यांचा केलेला खून या घटनांनी महाराष्ट्र हादरून गेला आहे.

## संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना मराठा महासंघाची सांत्वन भेट

बीड । प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्राला हळहळून सोडणारे, माणुसकीला काळिमा फसणारी घटना म्हणजेच बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्याकांड अत्यंत क्रूर व निष्ठुरपणे घडवण्यात आलेल्या या हत्याकांडाने समाजमन दुखावले गेले, देशमुख कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या कठीण समयी देशमुख कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याची शक्ती ईश्वर त्यांना प्रदान करो देशमुख कुटुंबीयांना मानसिक आधार देण्यासाठी मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप दादा जगताप व त्यांचे महाराष्ट्रातील सहकारी यांनी आज मस्साजोग येथे देशमुख कुटुंबीयांची सांत्वन भेट घेतली यावेळी स्व. देशमुख यांचे बंधू धनंजय, व त्यांचे वडील पंडितराव यांच्याशी चर्चा करत अखिल भारतीय मराठा महासंघ महाराष्ट्र राज्य सदैव आपल्या सोबत असून लवकरच एक शिष्टमंडळ घेऊन मुख्यमंत्री तथा दोन्ही उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन आरोपींना कठोरात कठोर शासन व्हावे यासाठी प्रयत्न करणार तसेच कायद्यात निष्णात



असणारे असणारे कायदे तज्ञ वकील मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याची कळवले स्व. देशमुख यांच्या मातोश्री, मुलांना भेटल्यावर मराठा महासंघाच्या अनेक पदाधिकारीही भावनिक सुन्न झाल्याचे पाहण्यास मिळाले या सांत्वन भेटीस मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप जगताप, ठाणे जिल्हाप्रमुख अविनाश राणे, महा मुंबई सरचिटणीस महेश सावंत, मुंबई अध्यक्ष बाळ लाड, खजिनदार अनंत मोरे, कार्यकारणी सदस्य माधवराव पाटील, दिंडोशी विधानसभा अध्यक्ष, राजेश सकपाळ, रत्नागिरी संपर्कप्रमुख विवोक कदम, सातारा संपर्कप्रमुख मारुती निकम, ज्येष्ठ समाजसेवक पंजाबराव मस्के पाटील, अध्यात्मिक आघाडीचे बब्रुवान शेंडगे बीड जिल्हाध्यक्ष गणेश नाईकवाडे बीड ता. अध्यक्ष अविनाश घिगे, युवराज मतकर, आकाश नाईकवाडे, बंटी देशमुख, नितीन नाईकवाडे, सह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

## भाऊ तोरसेकर यांना जीवन गौरव, श्रीमंत माने राज्यस्तरीय व गीता तिवारी विभागस्तरीय मानकरी

अमरावती । प्रतिनिधी


मराठी पत्रकार परिषद मुंबई संलग्नित अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारे पत्रकारितेतील सन २०२४ चे विविध पुरस्कार आज संघटनेचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांनी जाहीर केले. सोमवार, दि. २७ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या ऑडिटोरिअम येथे आयोजित सोहळ्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे जीवन गौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर, राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार श्रीमंत माने, विभागस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार गीता तिवारी, जिल्हास्तरीय (शहर) पत्रकारिता पुरस्कार ज्येष्ठ सुरेंद्र चापोरकर आणि जिल्हास्तरीय (ग्रामीण) पत्रकारिता पुरस्कारासाठी मंगेश भुजबळ मानकरी ठरले आहेत.

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघ हा अनेक वर्षांपासून जिल्ह्यात कार्यरत आहे. या संघामध्ये जिल्हयातून प्रकाशित होणाऱ्या दैनिकांचे संपादक, जिल्हा प्रतिनिधी, प्रतिनिधी, पत्रकार, छायाचित्रकार तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे जिल्हा प्रतिनिधी सदस्य म्हणून कार्यरत आहे. या संघातर्फे दरवर्षी पत्रकारांना विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे देण्यात येणाऱ्या सन २०२४ या वर्षीच्या पत्रकारिता पुरस्काकरिता पाच सदस्यीय निवड समिती तयार करण्यात आली होती. या समितीत विजय ओडे, संजय बनारसे अरुण तिवारी, सुधीर भारती, सुधीर केणे यांचा समावेश होतो. तसेच या समितीचे पदसिध्द सदस्य संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल, महासचिव प्रफुल घवळे आहेत.

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे सन २०२४ करिता निवड झालेल्या मानकरींचा सविस्तर परिचय:

राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार :- ३० वर्षपिक्षा अधिक काळ पत्रकारितेचा अनुभव असलेले भाऊ तोरसेकर उर्फ गणेश वसंत तोरसेकर





यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. भाऊ तोरसेकर हे राजकीय विषयांवर लिखाण करणारे आणि प्रतिपक्ष या नावाने यूट्यूब चैनलद्वारे आपली राजकीय भूमिका मांडणारे स्वतंत्र पत्रकार आहेत. तोरसेकर हे एक आर्किटेक्चर गॅज्युएट आहेत. भाऊ तोरसेकर यांनी १९६९ मध्ये आचार्य अत्रे यांच्या दैनिक मराठा येथून पत्रकारितेच्या कारकिर्दीला सुरूवात केली. साप्ताहिक भूपुत्र, ब्लिट्झ (मराठी), सकाळ (मुंबई) मधून पत्रकारिता केली. १९८५ ते १९८९ या काळात शिवसेनेचे मुखपत्र मार्मिक या साप्ताहिकातून कार्यकारी संपादक म्हणून काम पाहिले. त्यांनतर विवेक, चित्रलेखा यांसारख्या साप्ताहिकांमध्ये त्यांनी काम केले. १९९४ ते १९९७ च्या दरम्यान आपला वार्ताहर चे मुख्य संपादक म्हणून काम पाहिले. भाऊ १९९८ पासून स्वतंत्र पत्रकार म्हणून काम करत आहे. २०१० मध्ये पुण्यनगरी दैनिकातून उलट तपासणी हे सदर चालवलं. दि. २३ जून २०२१ रोजी भाऊंना राज्यपाल (महाराष्ट्र) भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी स्मृती सन्मान प्रदान करण्यात आला

जीवन गौरव पुरस्कार स्व. दादासाहेच काळमेघ स्मृती जीवन गौरव पत्रकारिता पुरस्कार या नावाने राहील. या पुरस्काराचे पुरस्काराचे पुरस्कर्ते हेमंतराव काळमेघ राहतील, या पुरस्काराचे स्वरूप रोख रूपये ४१,०००/- रोख, सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ राहील.

राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार श्रीमंत माने, संपादक- दैनिक लोकमत नागपूर आवृत्ती यांना जाहीर करण्यात येत आहे. त्यांनी पत्रकारितेमध्ये ३० वर्षापेक्षा अधिक काळ घालविला आहे. पत्रकारितेचा आरंभ काळात अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात सामाजिक कार्यकर्ता म्हणून कार्य, राष्ट्रीय व राज्यस्तरावरील मराठी, इंग्रजी वृत्तपत्रामध्ये चिखलदरा, अमरावती, अकोला, जळगांव, नाशिक, नागपूर आदी ठिकाणी ३३ वर्षे बातमीदार व संपादक पदावर कार्य. आदिवासी, ग्रामीण भागातील ज्वलंत समस्यांवर विविधांगी, मूलगामी व परिणामकारक वृत्तांकन, पत्रकारितेसोबत आदिवासी विकास, कुपोषणाची समस्या, वन व वन्यप्राणी संरक्षण, जलसंधारण, कृषी विकास, शेतकरी आत्महत्या, अनुशेष निर्मूलन, पर्यावरण रक्षण, फलोत्पादन विकास आदी विषयांवर क्षेत्रांमध्ये काम, महाराष्ट्र सरकारच्या जलसंधारण सलागार परिषदेचे तज्ज्ञ सदस्य म्हणून सहा वर्षे काम. नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, जळगांव येथील कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, अमरावतीच्या जुने विदर्भ महाविद्यालय या स्वायत्त संस्थेचे अभ्यासमंडळ तसेच समित्यांवर काम केले. राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार स्व. जुगलकिशोरजी अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार या नावाने राहील. या पुरस्काराचे पुरस्कर्ते दै. अमरावती मंडल व मातृभूमि राहतील. पुरस्काराचे स्वरूप रोख रु. ३१,००००, सन्मानचिन्ह, शाल श्रीफळ राहील.

विभागस्तरीय पत्रकारिता पुरस्कार :- गीता तिवारी, विदर्भ इंचार्ज तथा उपसंपादक दैनिक भास्कर यांना जाहीर करण्यात येत आहे. नागपूरमध्ये पत्रकारितेचा ३० वर्षाचा प्रदीर्घ अनुभव. १९९६ ते २००९ या कालावधीत साप्ताहिक विदर्भ चंडिका मध्ये उपसंपादक म्हणून कार्य. दैनिक भास्कर वृत्तपत्रात २००२ पासून अमरावती येथे ब्यूरो चीफ, यवतमाळ जिल्हा ब्यूरो चीफ व सद्यस्थिती नागपूर येथे विदर्भ इंचार्ज तसेच उपसंपादक म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. बंगलोर येथील एका प्रकाशन संस्थेमध्ये लेख, कविता सातत्याने प्रकाशित केल्या, अनेक वृत्तपत्रात स्तंभलेखन केले आहे.

विभागस्तरीय पत्रकारिता पुरस्काराचे पुरस्कर्ते राहुल गडपाले समूह संपादक दै. सकाळ मुंबई राहतील. पुरस्काराचे स्वरूप, रोख रू. २१,०००/-, सन्मानचिन्ह व शाल श्रीफळ सहील,

# छत्रपती संभाजीनगर येथे शुक्रवारपासून 'ॲग्री एक्स्पो-२५'

छत्रपती संभाजीनगर येथे शेतीमधील नवे तंत्रज्ञान व माहितीचा खजिना सादर करणारे 'ॲग्री एक्स्पो २५' हे कृषी प्रदर्शन यंदा १० ते १३ जानेवारी दरम्यान दिमाखात होत आहे. चार दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनाची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील जालना रोडवरील केंब्रिज स्कूल जवळ असलेल्या श्रीराम मंदिर ट्रस्टच्या मैदानावर हे भव्य प्रदर्शन भरणार आहे. प्रदर्शनाची वेळ सकाळी दहा ते सायंकाळी सात वाजेपर्यंत असून प्रवेश विनामूल्य आहे. ॲग्रिकोन न्यूट्रिटेक हे या प्रदर्शनाचे मुख्य प्रायोजक असून एन्झोकेम ॲग्रो केमिकल इंडस्ट्रीज, पवन ॲग्रो, पितांबरी ॲग्रो केअर डिव्हिजन, बी. जी. चितळे डेअरी, आत्मा (ॲग्रिकल्चर टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट एजन्सी), मेडा (महाऊर्जा), एमएआयडीसी हे सहप्रायोजक आहेत. तसेच रोहित कृषी इंडस्ट्रीज, इफ्को (इंडियन फार्मर्स फर्टिलायझर्स को-ऑपरेटिव्ह लिमिटेड) हे गिफ्ट स्पॉन्सरर्स आहेत. कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी कृषिविषयक ज्ञान, तंत्रज्ञानाची पर्वणी समजली जाते. देशविदेशांतील नामवंत ॲग्रो ब्रॅण्ड्स एकाच छताखाली येथे बघण्यास मिळतात. 'समृद्ध महाराष्ट्र म्हणजेच समृद्ध शेती' व्यवस्था असा संदेश देत आधुनिक शेतीचे धडे देणाऱ्या ॲग्रोवनच्या प्रदर्शनाकडून



मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, विदर्भासह राज्याच्या कानाकोपऱ्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागून असते.

अनेक ब्रॅण्ड्सचे लॉंचिंग :राज्यातील कोरडवाहू व बागायती शेतकऱ्याला नवे प्रयोग करण्यास प्रेरणा देण्याचे या प्रदर्शनाच्या निमित्ताने होते आहे. 'ॲग्री एक्स्पो २५'ला यंदा एक लाखाहून अधिक प्रगतिशील शेतकरी भेट देण्याचा अंदाज आहे. या प्रदर्शनातील २०० वर स्टॉल्सपैकी १०० पेक्षा अधिक कृषी कंपन्यांचे स्टॉल्स आहेत. कोट्यवधी रुपयांची उलाढाल अपेक्षित असलेल्या या प्रदर्शनात काही कंपन्या नव्या 'ब्रॅण्ड्स'चे लॉंचिंग करणार आहेत. प्रदर्शनातील स्टॉल्स बुकिंगला यंदाही उत्तम प्रतिसाद लाभला आहे. गेल्या वर्षी लाखाहून अधिक प्रगतिशील शेतकऱ्यांनी प्रदर्शनाला भेट दिली होती. कृषी क्षेत्रातील नवतंत्र प्रात्यक्षिकांसह समजावून घेण्यास या प्रदर्शनाचा उपयोग होतो.

यंत्र, नवतंत्र सर्वत्र :यंदाच्या कृषी प्रदर्शनात बागायती, कोरडवाहू तसेच संरक्षित शेतीमधील उपायांवर तंत्रज्ञान-यंत्रे शेतकऱ्यांना एकाच छताखाली पाहावयास मिळणार आहेत. कृषी शास्त्रज्ञ, संशोधक व अभ्यासकांना भेटता येणार आहे. शासनाचे विविध विभाग, कृषी संशोधन संस्था, नामवंत बँका, कृषी शिक्षण संस्था, बियाणे, खते, कीटकनाशके, हरितगृह उभारणी, यंत्रे व अवजारे क्षेत्रातील कंपन्या तसेच ट्रॅक्टर, पीक काढणी व कापणी यंत्रे, प्रक्रिया उद्योग, पॅकेजिंग, कोल्ड स्टोअर उद्योग, टिश्यू कल्चर, ठिबक व तुषार सिंचन उद्योगातील नामवंत कंपन्या या प्रदर्शनात सहभागी होत आहेत.

बक्षिसांची रोज सोडत :राज्यातील हजारो प्रयोगशील शेतकरी या प्रदर्शनाला भेट देणार आहेत. यानिमित्ताने बक्षीस जिंकण्याची संधीही प्रत्येकाला मिळणार आहे. दररोज एका भाग्यवान शेतकऱ्याला या प्रदर्शनात ट्रॅक्टरचलित एक पेरणी यंत्र भेट मिळणार आहे. त्यासाठी सोडत काढली जाणार आहे.

# ओळख ज्वारीवर पडणाऱ्या रोगांची

भारतात ज्वारीची लागवड प्राचीन काळापासून केली जात आहे. ज्वारी हे भरड धान्य पीक आहे. खाण्याव्यतिरिक्त हिरवा चारा म्हणूनही वापरला जातो. कमी पाऊस असलेल्या राज्यांमध्ये ज्वारीची लागवड धान्य तसेच चारा म्हणून केली जाते. भारतातील एकूण लागवडीयोग्य जमिनीत सुमारे १.२५ अब्ज एकर क्षेत्रात त्याचे उत्पादन होते. खाण्याव्यतिरिक्त अल्कोहोल आणि इथेनॉल बनवण्यासाठी ज्वारीचा वापर केला जातो. ज्वारी हे खरीप भरडधान्य उन्हाळी पीक असून हे पीक ४५ अंश तापमान सहन करून सहज वाढू शकते. मात्र अलीकडे या पिकावर देखील रोग पडण्याचे प्रमाण वाढतच चालले आहे.

बुरशी रोग :हा बुरशीमुळे होणारा संसर्गजन्य रोग आहे, हा रोग झाडाच्या एका भागात राहिल्यानंतर हळूहळू संपूर्ण झाडावर पसरतो. या संसर्गामुळे झाडाच्या फुलांचा रंग बदलतो आणि ज्वारीचे वजन हलके होते आणि पौष्टिक गुणवत्तेत घट होते त्याचबरोबर उगवण खराब होते. या बुरशीला प्रतिबंध करण्यासाठी पिकावर प्रोपिकोनाझोलची फवारणी करावी आणि लक्षात ठेवा की १५ ते २० दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. असे केल्यास या रोगावर नियंत्रण मिळवता येऊ शकते.

डाउनी बुरशी रोग :हा रोग ज्वारीच्या पानात आढळतो. याचे सर्वात वैशिष्ट्यपूर्ण लक्षण म्हणजे पानांवर हिरवे आणि पांढरे पट्टे तयार होणे. त्याच्या पानांच्या खालच्या पृष्ठभागावर ओस्पोर्सचे पांढरे डाग तयार होतात. यामुळे, वनस्पतीवरील फुलणे फारच लहान असतात आणि त्यांच्यामध्ये फक्त थोड्या प्रमाणात बिया तयार होतात. हा रोग टाळण्यासाठी जमिनीची खोल नांगरणी करावी जेणेकरून येथे तयार होणारे ओस्पोर्स कमी करता येतील. याशिवाय झाडांवर मेटालेक्सिल फवारणी करावी. ग्रेन स्मट :या रोगामुळे ज्वारीच्या दाण्यांचा रंग बदलून त्याचे देठ पूर्णपणे कमकुवत होतात. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे ज्वारीचे पीक पूर्णपणे कुजण्यास सुरुवात होते. हे टाळण्यासाठी काही कालावधीच्या अंतराने पिकांवर मॅन्कोझेबची फवारणी करावी.



# उडीद पिकावरील रोगावर असे मिळवा नियंत्रण



आपल्याकडे अनेक शेतकरी उडिदाची लागवड करतात. याची लागवड सौम्य उष्ण हवामानात केली जाते. यासाठी २५ ते ३० अंश तापमान योग्य आहे. हलकी वालुकामय, चिकणमाती माती, जिथे पाण्याचा निचरा चांगला होतो, तिची लागवड चांगली केली जाते. लागवडीपूर्वी शेताची खोल नांगरणी करून जमीन सपाट करावी. पावसापूर्वी पेरणी केल्यास झाडांची वाढ होण्यास मदत होते.

आज आपण याच्या लागवडीच्या वेळी कोणते रोग होतात आणि ते टाळण्याचे उपाय याची माहिती घेतल्यास नियंत्रण ठेवता येते.लीफ स्पॉट रोग :उडद पिकात हा रोग साथीच्या स्वरूपात पसरतो.

त्यामुळे झाडांची वाढ खुंटते आणि उत्पादनात मोठी हानी होते. रोगजनक वनस्पतींची पाने सुकतात आणि पडतात आणि प्रकाश संश्लेषण प्रक्रियेवर परिणाम होतो. या रोगाचा बंदोबस्त करण्यासाठी, रोगट झाडांचे अवशेष गोळा करून जाळावे जेणेकरून ते इतर वनस्पतींमध्ये पसरू नये. त्याच्या बियांवर उपचार करण्यासाठी कार्बेन्डाझिमची फवारणी करावी. याशिवाय डायथेन-झेड ७८ या औषधाचीही फवारणी करता येते.

पिवळा मोझॅक रोग :

हा विषाणूमुळे होणारा आजार आहे. हा संसर्ग पांढऱ्या माशीमुळे पसरतो. या रोगाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढून संपूर्ण पिकावर परिणाम होतो. या रोगाची लक्षणे पेरणीनंतर २ आठवड्यांनंतर दिसू लागतात. या रोगाची पाने गोलाकार पिवळी पडतात. या रोगाचा बंदोबस्त करण्यासाठी जुन्या वनस्पतींचे अवशेष आणि तण जाळून नष्ट करावेत.


कोळसा रॉट रोग :पंजाब आणि ओरिसा राज्यातील पिकांवर या रोगाचा प्रादुर्भाव अधिक दिसून आला आहे. हा चारकोल रॉट रोग मॅक्रोफोमिना फेजॉले नावाच्या बुरशीमुळे पसरतो. हा रोग झाडांच्या स्टेम आणि मुळांवर परिणाम करतो, ज्यामुळे ते कुजण्यास सुरवात होते आणि झाडे मरतात. काळी-तपकिरी बुरशी प्रभावित झाडांच्या मुळांवर आणि देठांवर तयार होते. हा रोग टाळण्यासाठी बियाण्यांवर कार्बेन्डाझिमची प्रक्रिया करावी.

भुताटक रोग :हा रोग खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामात उडीद पिकात आढळतो. त्याचा हल्ला प्रथम पानांवर होतो आणि पानांवर पांढर्या रंगाचे छोटे ठिपके तयार होतात. हे डाग मोठे होतात आणि एकमेकांत विलीन होतात आणि संपूर्ण पान झाकतात. या रोगाचा बंदोबस्त करण्यासाठी झाडाच्या मुळांवर विद्राव्य गंधक आणि कार्बेन्डाझिमची फवारणी करावी.फ

# कमी पावसाच्या स्थितीत भुईमुगाचे उत्पादन वाढवण्यासाठी करा हे उपाय

दुष्काळी भागात शेतकऱ्यांसमोर भुईमूग उत्पादनाचे मोठे आव्हान आहे. कमी पावसाचा भुईमूग पिकावर मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. कमी आर्द्रतेमुळे जमिनीत भेगा निर्माण होतात, त्यामुळे भुईमुगाच्या उत्पादनातही मोठी घट दिसून येते. अशा वेळी योग्य काळजी न घेतल्यास पिकाचे उत्पादन कमी होऊ शकते. मंदसौर कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ.जी.एस.चुंदावत यांनी सांगितले की, भुईमूग पीक अद्याप फुलोऱ्यात आहे. आता जमिनीतील ओलावा कमी असेल किंवा जमीन कोरडी असेल तर शेंगांच्या संख्येत मोठी घट होऊ शकते.

पावसाच्या कमतरतेवर कशी मात करावी : कमी पाऊस आणि दुष्काळामुळे भुईमुगाची उत्पादकता कमी होऊ शकते. त्यामुळे पिकांना वेळेत सिंचनाची व्यवस्था करण्याची गरज असते. जर बीन्स तयार झाला असेल तर झाडांच्या मुळांभोवती माती टाका, ज्यामुळे बीन्सचा विकास चांगला होऊ शकतो आणि पिकाच्या उत्पादनातही वाढ होताना दिसते. भुईमूग पिकामध्ये बोरॉनची कमतरता आढळल्यास ०.२% बोरॅक्स द्रावणाची फवारणी करावी आणि झिंकची कमतरता



असल्यास ०.५% झिंक सल्फेट आणि ०.२५% चुना वापरता येईल.

असे वाढवा उत्पादन : भुईमुगाचे उत्पादन वाढवण्यासाठी शेतकरी काही महत्त्वाच्या टिप्स वापरू शकतात. शेतकऱ्यांनी पेरणीनंतर ४० दिवसांनी रासायनिक फवारणी करावी. ०.७ ग्रॅम इंडोल ॲसिटिक ॲसिड ७ मिली अल्कोहोलमध्ये विरघळवून १०० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारणी करावी. एक आठवड्यानंतर ६ मिली इथरियल १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्यामुळे भुईमुगाच्या उत्पादनात १५ ते २७ टक्के वाढ होऊ शकते.

कीटक आणि रोगांपासून संरक्षण : भुईमूग पिकामध्ये कॉलर रॉट रोग होण्याची दाट शक्यता असते. त्याच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझिम, मॅन्कोझेब या बुरशीनाशकांचा वापर करावा.

भुईमुगातील टिक्का रोग रोखण्यासाठी २ किलो झिंक मॅंगनीज कार्बामेट आणि २.५ किलो झिनेब ७५% असलेले औषध प्रति हेक्टरी १००० लिटर पाण्यात विरघळवून उभ्या पिकावर दर १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ वेळा फवारणी करावी. भुईमुगात दीमक आढळून आल्यास, दीमक प्रतिबंधासाठी शेतकऱ्याने फोरेट १० जी प्रति हेक्टरी १० किलो किंवा क्लोरोपायरीफॉस २० ईसी ४ लिटर या प्रमाणात फवारणी करावी. त्याचबरोबर शेतकऱ्यांनी भुईमूग लागवडीमध्ये कोणताही रोग झाल्यास कृषी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.




## महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजी महाराजांनी सूर्यग्रहणाच्या निमित्ताने राजमाता जिजाऊ व सोनोपंत विश्वनाथ डबीर यांची सुवर्णतुला केली. श्री क्षेत्र महाबळेश्वर येथील देवळासमोर ही सुवर्णतुला झाली.

१६७३ : कोंडाजी फर्जंद यांनी अवघ्या ६० मावळ्यांनिशी पन्हाळा जिंकून महाराजांचे १३ वर्षे अपुर्ण असलेले स्वप्न पूर्ण केले.

१८३२ : पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी इंग्रजी व मराठीतील पहिले साप्ताहिक वृत्तपत्र 'दर्पण' सुरू केले.

१८३८ : सॅम्युअल मॉर्स यांनी तारयंत्राचा शोध लावला.

१९०७ : मारिया मॉंटेसरी यांनी पहिली मॉंटेसरी शाळा सुरूकेली. त्यांच्या शाळांमुळे पूर्वप्राथमिक शिक्षणात आमूलाग्र बदल झाला.

१९१२ : न्यू मेक्सिको हे अमेरिकेचे ४७ वे राज्य बनले.

१९२४ : राजकारणात भाग न घेणे व रत्नागिरी जिल्ह्यातच राहणे या अटींवर स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जन्मठेपेतुन सशर्त मुक्तता

१९२९ : गोरगरिब व रुग्णांची सेवा करण्यासाठी मदर तेरेसा यांचे कोलकाता येथे आगमन

१९४४ : दुसरे महायुद्ध - रशियन सैन्य पोलंडमध्ये शिरले.

१९४६ : आजच्या दिवशी व्हिएतनाम येथे पहिल्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या.

१९८९ : केहर सिंह आणि सतवंत सिंह यांनाइंदिरा गांधींच्या हत्या करण्याच्या गुन्हात फाशीची शिक्षा देण्यात आली.

१९९४ : सिडनी टेस्ट सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या टीम ने ऑस्ट्रेलिया च्या टीम ला ५ रन नी हरविले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४१२ : फ्रान्सला परकीय जोखडातून मुक्त करणार्या 'जोन ऑफ आर्क'चा जन्म. तिला चेटकीण ठरवून जाळण्यात आले. नंतर मात्र तिला संत ठरवले गेले. ती 'द मेड ऑफ ऑर्लिन्स' या टोपणनावानेही ओळखली जाते. (मृत्यू: ३० मे १४३१)

१७४५ : बलूनच्या सहाय्याने आकाशात उडण्याचे प्रयोग करणाऱ्या जाक्कास एलियन मॉंटगोल्फिएर यांचा जन्म.

१८१२ : बाळशास्त्री जांभेकर - मराठी पत्रकारितेचे पितामह, १८३२ मधे 'दर्पण' हे वृत्तपत्र काढून त्यांनी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. 'दिग्दर्शन' हे मराठीतील पहिले मासिकही त्यांनीच १८४० मधे सुरू केले. (मृत्यू: १८ मे १८४६)

१८२२ : उत्खनन करून ट्रॉय आणि मायसेनी या नगरीचा शोध लावणाऱ्या हेन्रीचा श्लीमन यांचा जन्म.

१८६८ : गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ 'दासगणू महाराज' - आधुनिक संतकवी, 'भक्तिरसामृत', 'भक्तकथामृत' आणि 'संतकथामृत' हे त्यांचे संतचरित्रात्मक ग्रंथ आहेत. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९६२)

१८८३ : खलील जिब्रान - लेबनॉनमधे जन्मलेले अमेरिकन कवी, लेखक व कलाकार (मृत्यू: १० एप्रिल १९३१)

१९१० : ला प्रसिद्ध भारतीय गायक जी. एन. बालासुब्रमनियम यांचा जन्म.

१९१८ : ला भारतीय प्रसिद्ध गायक भारत व्यास यांचा जन्म.

१९२५ : रमेश मंत्री - प्रवासवर्णनकार, कथाकार, विनोदी लेखक (मृत्यू: १९ जून १९९८)

१९२८ : नाटककार, चित्रपटकथालेखक, पत्रकार व साहित्यिक विजय तेंडुलकर यांचा जन्म. (मृत्यू: १९ मे २००८ पुणे, महाराष्ट्र)

१९३१ : डॉ. आर. डी. देशपांडे - पर्यावरण क्षेत्रातील शा'स्त्रज्ञ, 'महाराष्ट्र असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स'चे (आघारकर रिसर्च इन्स्टिट्युट) अध्यक्ष

१९४० : प्रसिद्ध भारतीय लेखक नरेंद्र कोहली यांचा जन्म.

१९४९ : परमवीर चक्राने सन्मानित सुभेदार बाना सिंग यांचा जन्म.

१९५५ : रोवान ॲटकिन्सन - विनोदी अभिनेते व पटकथालेखक

१९५९ : कपिल देव निखंज - भारतीय क्रिकेट कप्तान, समालोचक व प्रशिक्षक

१९६५ : हिमाचल प्रदेश चे १४ वे मुख्यमंत्री जय राम ठाकूर यांचा जन्म.

१९६७ : ऑस्कर पुरस्कारविजेते जगप्रसिद्ध गायक ए. आर. रेहमान यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९६ : जिवबा दादा बक्षी - महादजी शिंदे यांचे सेनापती, मुत्सद्दी

१८४७ : त्यागराज - दाक्षिणात्य संगीतकार (जन्म: ४ मे १७६७)

१८५२ : लुई ब्रेल - अंधांना उपयोगी पडणाऱ्या ब्रेल लिपीचे जनक व शिक्षक (जन्म: ४ जानेवारी १८०९)

१८८४ : ग्रेगोर मेंडेल - जनुकांची संकल्पना मांडणारा जर्मन जीवशास्त्रज्ञ (जन्म: २० जुलै १८२२)

१८८५ : भारतेंदू हरिश्चंद्र - आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (जन्म: ९ सप्टेंबर १८५०)

१९१८ : जी. कॅंटर - जर्मन गणितज्ञ (जन्म: ३ मार्च १८४५)

१९१९ : थिओडोर रुझव्हेल्ट - अमेरिकेचे २६ वे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २७ आक्टोबर १८५८)

१९७१ : प्रफुल्लचंद्र तथा पी. सी. सरकार - जादूगार (जन्म: २३ फेब्रुवारी १९१३)

१९८१ : ए. जे. क्रोनिन - स्कॉटिश लेखक (जन्म: १९ जुलै १८९६)

१९८४ : 'विद्यानिधी' सिद्धेश्वरशास्त्री विष्णू चित्राव - महामहोपाध्याय, वैदिक साहित्याचे अभ्यासक व मराठी कोशकार (जन्म: १ फेब्रुवारी १८८४)

२००८ : भारतीय ऑर्थोपेडिक सर्जन प्रमोद करन सेठी यांचे निधन.

२००९ : जम्मू काश्मीर चे माजी मुख्यमंत्री गुलाम मोहम्मद शाह यांचे निधन.

२०१० : प्रल्हाद ईरबाजी सोनकांबळे - लेखक व इंग्रजीचे प्राध्यापक (जन्म: १६ जुलै १९४३).

२०१७ : भारतीय अभिनेता ओम पुरी यांचे निधन.

# जगप्रसिध्द गायक डागर बंधूंना पद्मश्री शंकर बापूजी धृपद गौरव पुरस्कार प्रदान

## अंबाजोगाईत संगीत सभेने रसिक श्रोते मंत्रमुग्ध





अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील पद्मश्री कै.शंकरबापू आपेगावकर स्मृती प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी दिला जाणारा पद्मश्री शंकर बापूजी धृपद गौरव पुरस्कार यावर्षी शुक्रवार, दि.३ जानेवारी रोजी जगप्रसिध्द धृपद गायक उस्ताद नफिसोद्दिन डागर व अनिसोद्दिन डागर या बंधूंना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यानिमित्त झालेल्या धृपद संगीत सभेत डागर बंधूंनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.या प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी संगीत व वारकरी संप्रदायातील मान्यवर व्यक्तींना पद्मश्री शंकरबापूंच्या स्मृती हा पुरस्कार दिला जातो. यंदाचा पुरस्कार सोहळा येथील इट ऍंड स्टे या हॉटेलच्या सभागृहात झाला. अध्यक्षस्थानी नॅचरल शुगरचे प्रमुख बी.बी.ठोंबरे हे होते. योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाळे, उद्योजक लक्ष्मणराव मोरे, डॉ.नंदकिशोर सोमवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रख्यात पखावज वादक उध्दवबापू आपेगावकर व संध्याताई आपेगावकर यांची उपस्थिती होती.

पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांनी आयुष्यभर पखावजाची संगीत कला समर्पणातून जोपासली. संगीत पाषाणालाही पाझर फोडते, मन आणि बुध्दी तल्लीन होण्याची जादू संगीतामध्ये आहे. असे सांगून डागर बंधूंचे धृपद गायन श्रवण करण्याची संधी मिळाल्याच्या भावना बी.बी.ठोंबरे यांनी व्यक्त केल्या. तर वडील उस्ताद सईदोद्दीन डागर यांच्यामुळे आम्ही धृपद संगीतात उभे राहिलो, त्यांची ही धृपद संगीताची पताका खांद्यावर घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहोत. बापूंच्या नांवे मिळालेल्या पुरस्काराने आमची जबाबदारी आणखी वाढलेली आहे. त्याचा आदर करून शंकरबापूंच्या कलेला व त्यागाला उस्ताद डागर बंधूंनी नमन केले. याप्रसंगी लक्ष्मणराव मोरे व डॉ.सुरेश खुरसाळे यांनीही शंकर बापूंच्या अनेक आठवणी सांगितल्या. पं.उध्दवबापू आपेगावकर यांनी पुरस्काराची संकल्पना व भुमीका मांडली. या पुरस्काराचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न करणार असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. सन्मानपत्राचे वाचन सीमा सोमवंशी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसाराम जोशी यांनी केले. तर ऍड.संतोष पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास माईर्स एमआयटी परिवारातील जेष्ठ तुळशीराम कराड यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी मधुवंती देव (पुणे), प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे, संगीत क्षेत्रातील बार्शीकर, देविदास कुलकर्णी (कळंब), तुकाराम महाराज मुंडे, ज्येष्ठ समाजसेवक विठुसेठ आग्रोया यांच्यासह शहरातील अध्यात्म, संगीत, शिक्षण, पत्रकारीता, उद्योग, क्रीडा, सहकार, समाजकारण, राजकारण, शेती, व्यापार, सांस्कृतिक, नाट्य आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

या पुरस्कार सोहळ्यापुर्वी डागर बंधूंचे धृपद गायन झाले. प्रारंभी त्यांनी राग आलाप व जोडझाला घेऊन कर्नाटकी थाटातील काम्बोजी हा राग सादर करून आपले वेगळेपण दाखवले. त्यांनी गायलेल्या शिव, शिव, शिव या आडाना रागाची लय बध्दता व आवाजातील आर्जवाने रसिक मंत्रमुग्ध झाले होते. सूल तालातील बंदिशीमध्ये धृपद व पखावजाची जुगलबंदी झाली. पंडित उध्दवबापू आपेगावकरांनी आपल्या पखावज वादनाने या संगीत सभेला झालर चढवली. सभागृहात उपस्थित रसिकांनी या जुगलबंदीला टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली.

## संविधान बचाव जन आक्रोश मोर्चात सहभागी व्हा -ॲड. राजेश शिंदे

बीड। प्रतिनिधी

जिल्हा परभणी येथे जाणीवपूर्वक संविधान प्रतिमेची केलेली विटंबना या सह शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा झालेला संशयास्पद मृत्यू तसेच देशाच्या संसदे मध्ये गृहमंत्री अमित शाहा यांनी संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबत अपमानास्पद ऐकेरी भाषेत जाणीवपूर्वक केलेले विधान व केज तालुक्यातील मस्साजोग येथे मानवतेला काळीमा फासणारा सरपंच संतोष देशमुख यांचा केलेला निर्घृण खून या प्रमुख मागण्यांसह विविध प्रश्नानं बाबत जुलुमी सरकारच्या विरोधात दि. ०६ जानेवारी २०२५ रोजी बीड शहरात लोकशाही मार्गाने भव्य संविधान बचाव जन आक्रोश मोर्चाचे आयोजन केलेले आहे. या संविधान बचाव जन आक्रोश मोर्चाला बहुसंख्येने उपस्थित राहा आवाहन आंबेडकरवादी चळवळीतील धडाडीचे कार्यकर्ते ॲड. राजेश शिंदे यांनी केले आहे.



या बाबत सविस्तर वृत्त असे की, सद्य परिस्थितीत देशामध्ये संविधान विरोधी शक्ती संविधानाच्या विरोधात काम करत असून संविधान संपवण्याचा प्रयत्न करत आहेत. कायदेशीर दृष्ट्या हे शक्य नाही याची कल्पना त्यांना असताना सुद्धा घटना दुरुस्त्या करून संविधान कमकुवत करण्याचा प्रयत्न करत आहेत. या सह देशात जाती धर्मात वाद लावुन राजकीय पोळी भाजण्याच काम जोरात सुरू झालेलं आहे. अश्यातच महाराष्ट्रात जिल्हा परभणी येथे जाणूनबुजून संविधान प्रतिमेची केलेली विटंबना तसेच शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांचा झालेला संशयास्पद मृत्यू व देशाच्या संसदे मध्ये गृहमंत्री अमित शाहा यांनी संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबत ऐकेरी भाषेत केलेले जाणीवपूर्वक विधान या सह केज तालुक्यातील मस्साजोग येथे मानवतेला काळीमा फासणारा सरपंच संतोष देशमुख यांचा केलेला खून या घटनांनी महाराष्ट्र हादरून गेला आहे. या सर्व घटनांच्या निषेधार्थ व जबाबदार असणाऱ्या दोषींवर कठोर कार्यवाही होऊन न्याय मिळण्या करिता जुलमी सरकारच्या विरोधात दि. ०६ जानेवारी रोजी सकाळी ठीक ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालय बीड पर्यंत भव्य संविधान बचाव आक्रोश मोर्चाचे आयोजन करून सरकारला जाब विचारण्यात येणार आहे. या संविधान बचाव जन आक्रोश मोर्चाला बहुसंख्येने उपस्थित राहा आवाहन प्रसिद्धीपत्रका द्वारे आंबेडकरवादी चळवळीतील धडाडीचे कार्यकर्ते ॲड. राजेश बबनराव शिंदे यांनी केले आहे.

## थोडक्यात



### जिल्हा उपाध्यक्षपदी सुमित सुभाषराव शिंदे यांची निवड

हिंगोली। प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेना चे राज्य सचिव अमोल भिसे आणि जिल्हाध्यक्ष प्रमोद उर्फ बंडू कुटे यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय विश्रामगृह येथे रविवारी दिनांक ५ जानेवारी रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेच्या हिंगोली जिल्हा उपाध्यक्ष या पदावर सुमित सुभाषराव शिंदे रा. रोकडेश्वर नगर वसमत यांची निवड करण्यात आली.तसेच औंढा तालुका महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेना तालुका अध्यक्षपदी विनायक रामकिशन सोळंके यांची निवड करण्यात आली. यावेळी वसमत तालुका अध्यक्ष काशिनाथ टोम्पे पाटील, तसेच तालुका सचिव मदत आंबोरे, यांच्यासह इतर उपस्थित होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्य आता जिल्ह्यात वेगाने करणार असून समाजातील गोरगरिबांना न्याय देण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे मत वसमत चे नवनिर्माण शेतकरी सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष सुमित शिंदे यांनी सांगितले.

### पाटोदा येथे सावित्रीबाई फुले जयंती

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील संत बाळुदेव महाराज विद्यालय व महिला महाविद्यालय पाटोदा येथे महिला शिक्षणाची जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रथम मुख्याध्यापक मधुकर बोखारे, महिला महाविद्यालयाचे प्राचार्य



राजेंद्र आविळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी जयंतीनिमित्त प्राध्यापिका, प्राध्यापक, मुख्याध्यापक व शिक्षकांनी सावित्रीबाई फुले यांनी महिला शिक्षणामध्ये दिलेल्या योगदानाबद्दल विद्यार्थी भाषणातून सांगितले व तसेच विद्यार्थ्यांनी यावेळी विद्यार्थ्यांनी सुध्दा भाषणातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावर भाषण केले यावेळी प्राचार्य राजेंद्र अविळे, मुख्याध्यापक मधुकर बोखारे, प्राध्यापक विजय जावळे,प्रा.अंकुश नाईकनवरे,प्रा.गर्जे मडम,प्रा.येवले,प्रा.मडम,प्रा.कोल्हे मडम, शिक्षक, देसाई सर,वाघसर,शेख सर, बोडखे सर, राम देसाई, सचिन शिंदे, गौतम चंदनशिवे, बाबाजी चव्हाण,जाधववरसह अनेकजण उपस्थित होते

### जवळा विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

बीड: स्त्रियांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी शिक्षणरूपी दागिना त्यांना देणे ही काळाची गरज आहे हे जाणून त्यांच्या अंधकारमय जीवनाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी कायमस्वरूपी प्रकाशमान केले असे प्रतिपादन जवळा माध्य व उच्च माध्यमिक विद्यालायचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य भगवान गव्हाणे यांनी केले. जवळा विद्यालयात शुक्रवारी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली . या जयंती कार्यक्रमानिमित्त विद्यार्थी- विद्यार्थिनींनी आपल्या शब्द अविष्कारातुन सावित्रीबाई यांच्या स्त्री शिक्षण या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी भगवान गव्हाणे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी सरपंच शहादेव खांडे हे होते. आपल्या अध्यक्षीय समारोपात गव्हाणे सर म्हणाले की,सावित्रीबाई यांनी समाजाला संतुलित आणि विकसीत करण्यासाठी प्रत्येक स्त्री शिकली पाहिजे यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून आपले पती ज्योतिबा फुले यांच्या सहकार्याने स्त्रियांच्या जीवनात शैक्षणिक क्रांती घडवली. त्यांच्या या उत्तुंग कार्यामुळंच आजची आधुनिक स्त्री खंबीर आणि सक्षम बनली आहे.

## महिलांना आत्मसन्मानाचे दार सावित्रीबाईंने खुले केले -डॉ. इनामदार

### गढी महाविद्यालयात साविञीबाई फुले जयंती साजरी

गढी। प्रतिनिधी

३ जानेवारी, जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला ,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी, येथे सावित्रीबाई फुले जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. तबस्सुम इनामदार या बोलत होत्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे होते तर मंचावर डॉ. अयोध्या पवळ यांची उपस्थिती होती

इतिहासाची पाने चाळली असता सावित्रीबाई फुले यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये अनाकलनीय सामाजिक व्यवस्थेत महिलांना प्रथमता आत्मसन्मानाचे दार खुले केले. शिक्षण हे मानसिक, आत्मिक प्रगतीचे एकमेव साधन आहे. म्हणूनच त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. समाज घटकातल्या अनेक व्यवस्थेने याबद्दल तीव्र विरोध केला. पण त्या विरोधाला न जुमानता आज महिला जी पुढारली ती केवळ आणि केवळ सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच असे डॉ. तबस्सुम इनामदार यांनी सांगितले कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये डॉ. अयोध्या



पवळ यांनी स्त्री शिक्षणाच्या जागर करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकतानाच कार्यक्रमाचा हेतू कथन केला. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी महिलांच्या अधिकार आणि हक्क या विषयीची जी आज जाणीव जागृती निर्माण झाली त्याची प्रेरणाच सावित्रीबाई फुले आहेत सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिल्पा ससाने यांनी केले. यावेळी कार्यक्रमास प्रा. हिरा पोटकुले, डॉ. धर्मराज कटके डॉ. शिवलाल घुगे डॉ. कलंदर पठाण डॉ. बाळासाहेब सरपते डॉ. महारुद्र गव्हाणे प्रा. लोणकर प्रा. रमेश रिंगणे यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थिनींची बहुसंख्येने उपस्थिती होती.

## अंबाजोगाईत सौहार्दपूर्ण वातावरणात इज्तेमा; लाखो मुस्लिम बांधवांचा सहभाग

अंबाजोगाई। प्रतिनिधी

शहरात मुस्लीम समाजाचा दोन दिवसीय जिल्हास्तरीय इज्तेमा अत्यंत सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडला. सदर बाजार नजीक चांदमारी परिसरात जवळपास दीडशे एकर भागावर इज्तेमासाठी अत्यंत नियोजनबद्ध तयारी करण्यात आली होती. इज्तेमासाठी जिल्हाभरातील सर्व तालुक्यातून जवळपास दोन लाख मुस्लीम बांधवांनी प्रार्थनेसाठी एकत्र येत सर्वांचा हिताची आणि कल्याणाची दुवा मागितली.

मागील एक महिन्यापासून अंबाजोगाईतील इज्तेमाची जोरदार तयारी सुरु होती. चांदमारी परिसरातील दीडशे एकर जागेवर इज्तेमा आयोजित करण्यात आला. मुस्लीम धर्मियांमध्ये इज्तेमाचे अनन्यसाधारण महत्व आहे. गुरुवारी पहाटेपासूनच जिल्हाभरातून लाखो मुस्लीम बांधव इज्तेमास्थळी एकत्र येऊ लागले होते. दोन दिवसीय बीड जिल्हा इज्तेमाची सुरुवात गुरुवारी (दि.२) पहाटेच्या नमाज (फजर) नंतर सुरू झाली. शुक्रवारी मगरीबच्या नमाज नंतर



दुवा होऊन इज्तेमाची सांगता झाली. यावेळी उपस्थितांनी प्रार्थनेसाठी एकत्र येत सर्वांच्या हिताची आणि कल्याणाची दुवा मागितली. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांनी दाखविलेल्या मार्गावर सर्व आबालवृद्धांनी चालावे, सर्वांसोबत सज्जन पणाने वागावे व सर्व मानवांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची सुद्धा गांभीर्याने दखल घ्यावी अशी प्रार्थना व सूचना मौलाना यांनी केली.

इज्तेमामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये यासाठी हजारो स्वयंसेवकांनी अहोरात्र मेहनत घेतली. पाणी, विद्युत, शामियाना यासाठीचे विभाग वाटून देण्यात आले होते. मागील महिनाभरापासून जागा सफाई, वीज, पाणी पुरवठा, पेंडॉल उभा करण्याचे काम सुरू होते. मुख्य शामियाना जवळपास नऊ एकर भागावर उभारण्यात आला होता. येणार्या बांधवांची गैरसोय होऊ नये यासाठी स्वच्छता गृह, वाजु खाना, जेवणाचे स्टॉल, नाष्ट्याचे हॉटेल तसेच पार्किंग व्यवस्था असा मोठं नियोजन करण्यात आले होते. यासाठी शेकडो स्वयंसेवक नियुक्त करण्यात आले होते. इज्तेमामध्ये वैद्यकीय काश देखील उभारण्यात आला होता. डॉक्टर, सर्व वैद्यकीय सेवा, गोळ्या औषधे आदी मोफत सुविधा होती. कोणत्याही प्रकारचा गालबोट न लागता अतिशय सौहार्दपूर्ण वायावारणात इज्तेमाचा कार्यक्रम पार पडला.

## अबॅकस प्रवेश परीक्षामध्ये सम्राज्ञी त्र्यंबक घोडकेला सुवर्णपदक

### जागतिक अबॅकस चॅम्पियनशिपसासाठी निवड

बीड। प्रतिनिधी

बौद्धिक आणि सर्वांगीण विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. बीड मधील अबॅकस व वैदिक स्टडी केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्तरावर, अबॅकस आणि वैदिक चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन अबॅकस पहिल्या लेवलपरीक्षांमध्ये ज्युनियर ग्रुपमध्ये सम्राज्ञी त्र्यंबक घोडकेला जागतिक अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली आहे.

बीडच्या अबॅकस सेंटरमध्ये १९ डिसेंबर २०२४ रोजी निकाल जाहीर झाल्याप्रमाणे सर्वोत्कृष्ट गोल्ड मेडल आणि ट्रॉफी मिळवून सम्राज्ञी त्र्यंबक घोडकेला



सर्वोत्कृष्ट मेडलिस्ट सायटेशन प्रमाणपत्र रँकर प्रमाणे चॅम्पियनशिपमध्ये सहभाग मिळवला आहे. जागतिक अबॅकस स्पर्धा फेब्रुवारी महिना २०२४ मध्ये होत असून त्यामध्ये भारतासह मोरोक्को, नेपाळ, श्रीलंका, युनायटेड किंग्डम, यु एस ए , सिंगापूर, झिंबाब्वे, दक्षिण आफ्रिका, देशांमधील दोन हजार पेक्षा जास्त विद्यार्थी सहभाग घेणार आहेत.

## अंधश्रद्धा, खुळचट कल्पना बाजूला केल्याशिवाय धर्म समजणार नाही-संतोष महाराज डोंगरे

बीड। प्रतिनिधी

अध्यात्मिक क्षेत्रामध्ये काम करत असताना असे लक्षात येते की वरवरच्या गोष्टींना, अंधश्रद्धा वाढवणाऱ्या गोष्टींना बऱ्याच वेळा जास्तीचे महत्व दिले जाते आणि त्यामुळे धर्माचे मूळ स्वरूप समाजाला कळतही नाही. अंधश्रद्धा, खुळचट संकल्पना, चुकीच्या चालीरीती बाजूला सारल्याशिवाय धर्माचे मूळ स्वरूप समजणार नाही असे प्रतिपादन समाजप्रबोधनकार ह.भ.प. संतोष महाराज डोंगरे यांनी केले. शनीच्या साडेतीन पिठांपैकी अर्धपीठ असणाऱ्या ऐतिहासिक शनी मंदिरामध्ये सुरू असणाऱ्या शनी जन्मोत्सवानिमित्तच्या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये ते बोलत होते. त्यांनी कीर्तनाच्या निरुपणासाठी संत तुकाराम महाराजांचा 'क्षणोक्षणी हाची करावा विचार तरावया पार भवसिंधू' हा अभंग निवडला होता.

पुढे बोलताना ते म्हणाले की, अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी संतांनी आपले जीवन झिजवले. वारकरी संतांनी मानवा मानवामध्ये कधी भेदाभेद केला नाही. पंढरपूरच्या वाळवंटामध्ये फक्त वारकरी ही ओळख संतांच्या आदर्शामुळे निर्माण झाली. जातिभेद, वर्णभेद, लिंगभेद, प्रांतभेद या सर्व भेदांच्या पलीकडे जाऊन संतांनी एकात्मतेची शिकवण देऊन स्वतः आचरण तसे केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीच्या लोकांना एकत्र करून मावळा अशी ओळख दिली. शिवरायांच्या मावळ्यांच्या व वारकऱ्यांच्या हातामध्ये असणारा ध्वज हा भगवा आहे. भगवी पताका ही त्यागाची व समर्पणाची निशाणी आहे. दोन्हीही ठिकाणी असणारी भगवी पताका अत्यंत तेजोमय इतिहास सांगते. आपला भारत देश जशी संतांची भूमी आहे तसंच या ठिकाणी समाज सुधारक व महामानव हे सुद्धा होऊन गेलेले आहेत. संत, महामानव हे आम्हा सर्वांसाठी



दीपस्तंभ असायला हवेत. आम्ही चुकीच्या, भोंदू लोकांच्या नादी न लागता संतांनी निर्माण केलेल्या ग्रंथांचा अभ्यास करून जीवनाचा मार्गक्रमण करायला हवं असंही ते म्हणाले. बीड येथील शनी मंदिराचा होत असलेला कायापालट याबद्दलही त्यांनी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष रामनाथ खोड यांचे अभिनंदन केले. यावेळी कीर्तनासाठी ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज उबाळे, भाऊसाहेब महाराज धांडे, वैभव महाराज काकडे, दत्तात्रेय महाराज बहिर, रमेश महाराज जाधव विणेकरी वाल्मीक महाराज साठे मृदुंग वादक तेजस मते, अभिषेक महाराज शिंदे, सतीश कदम, ढास, बाळासाहेब मुळीक, शामराव वाव्हळ, आदित्य पायगुडे यांच्यासह बीड शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त अंबाजोगाईत अभिवादन रॅलीने लक्ष वेधले

### शिस्त आणि शांतता पाळून सावित्रीमाईंची जयंती उत्साहात साजरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी येथील महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांच्या वतीने अंबाजोगाईत ३ जानेवारी २०२५ रोजी ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त काढण्यात आलेल्या अभिवादन रॅलीने अंबाजोगाईकरांचे लक्ष वेधून घेतले. अभिवादन रॅलीस महिला भगिनी व युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अंबाजोगाईत ३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८ वाजता कै.गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळेत ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास मेजर शांतीनाथ



बनसोडे यांच्या हस्ते अभिवादन करून जयंती उत्सव सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला. यावेळी सुलोचनाताई आरसुडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता अभिवादन बाईक रॅली काढण्यात आली. ही रॅली साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे चौक, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रणवीर तानाजी मालुसरे चौक, पाटील चौक, गुरूवार पेठ सिमेंट रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे निघून ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले चौक येथे रॅलीचा समारोप झाला. या सर्व चौकातील नामफलकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अभिवादन रॅली शिस्त आणि शांतता पाळून काढण्यात आली. अभिवादन रॅलीसाठी समन्वयक गणेश जाधव यांनी पुढाकार घेतला. त्यांना आयोजक प्रकाश बलुतकर, विष्णु राऊत, अंकुश घोडके, राम जिरे, संतोष राऊत, अनंत मसने, डॉ.दत्तात्रय मसने, भागवत मसने, करपुडे सर, ज्ञानेश्वर जिरे, बालासाहेब माळी, डॉ.फुटाणे सर, मधुकर घोडके, बंडू मसने, रमेश जिरे, बलुतकर सर, मिलिंद बाबजे, पंकज राऊत, नितीन जिरे, राम घोडके, मंगेश बलुतकर, अभय जिरे, निवृत्ती जिरे, संदेश डाके, शरद माळी, भारत घोडके, श्रीकृष्ण घोडके, बळीराम धनवडे, आकाश चोपने, गजानन घोडके, योगेश कातळे, अक्षय घोडके, बालाजी घोडके, बालाजी जिरे, दिपक आरसुडे, ऋषि मसने, कृष्णा मसने, नवनाथ माळी, अनिकेत घोडके, पवन घोडके, अक्षय चोपने, पवन जिरे, दामोदर माळी, भागवत जिरे, किरण भालेकर, सुधीर माळी, रोहन माळी, बाळु फुलझळके, दत्तात्रय बनसोडे, शाहीर तुकाराम, प्रविण जोगदंड, राहुल जिरे, अतुल राऊत, सतिश राऊत, शिवराज राऊत, संदीपान देशमाने, गोविंद पाथरकर, ऋषि पाथरकर, किरण पाथरकर, नंदकुमार बलुतकर आदींसह महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांचे सहकार्य लाभले.

# बुथप्रमुखांनी घरोघरी जाऊन जास्तीत जास्त भाजपा सदस्य नोदंणी करून घ्यावी – लक्ष्मण पवार

## शहरासह सर्कलमधील बुथवर २०० भाजपा सदस्यांची नोदंणी करण्याचे उद्दिष्ट

गेवराई । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रात भाजपा सदस्य आभियाण सुरु आहे तरी मतदारसंघातील प्रत्येक बुथवर जाऊन जास्तीत जास्त सदस्य नोदंणी नोदणी करण्यासाठी कामाला लागावे असे आवाहन मा.आ.लक्ष्मण पवार यांनी केले आहे

आज गेवराई येथील मा.आ.लक्ष्मण पवार यांच्या कोल्हेररोड वरील भारतीय जनता पार्टी कार्यालय येथे भारतीय जनता पार्टी २२८–गेवराई विधानसभा जिल्हा बीड.भाजपा



सदस्य अभियानास सुरुवात झाली यावेळी विधानसभा निवडणूक प्रमुख मा.शाम आबा कुंड नगराध्यक्ष सुशील भाऊ जंजाळ, उपनगराध्यक्ष राजेंद्र दादा राक्षभुवनकर ,भगवान घुबार्डे,राहुल खंडागळे,याहीया खॉन, दादासाहेब गिरी,अनिल पौळ, भरत गायकवाड,अँड.सुरेश पवार, संजय इगळे,समाधान मस्के, अमोल मस्के,राम पवार, रामप्रसाद आहेर,लक्ष्मण चव्हाण,धनवडे मामा, चेअरमन गंगाधर, श्रिराम घाटुळ,मतिन कुरेशी, बबन राठोड, बाबा खरात, आदी उपस्थित होते

शक्ती प्रमुख बुथ प्रमुख नगरसेवक सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व भारतीय जनता पार्टी सर्व कार्यकर्ते मोठ्या उपस्थित होते.

गेवराई मतदार संघाच्या प्रत्येक सर्कल गावामध्ये भाजप सदस्य नोंदणी मोठ्या प्रमाणात करण्याचे नियोजन जबाबदारीची नियुक्ती करण्यात आली.

भाजपचे सदस्य होण्याकरिता–८८००००२०२४ या क्रमांकावर मिस्ड कॉल द्या आणि भाजपचे सदस्य व्हावे असे आवाहन मा.लक्ष्मण पवार यांनी केले आहे. यावेळी मतदारसंघातील ४०७ बुथ आहेत तर सर्व बुथप्रमुखांना एक बुथवर किमान २०० सदस्यांची नोदंणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे तरी शहरासह मतदार संघातील बुथप्रमुखांनी घरोरी जाऊन जास्तीत जास्त सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येणार आहे.

# खा.बजरंग सोनवणे यांना पोलीस अधिकाऱ्याची धमकी!

बीड । प्रतिनिधी

**वादग्रस्त सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांनी 'बीड पोलीस प्रेस ग्रुप 'वर शनिवारी सायंकाळी एक पोस्ट केली. ज्यामुळे पोलीस दलात वादळ उठले. 'या खासदाराची चड्डी सुध्दा जागेवर राहणार नाही, मी जर प्रेस घेतली तर' अशी पोस्ट मुंडे यांनी केली.**



बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथे ९ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्रात संताप व्यक्त केला गेला. या हत्येचा तपास आता सीआयडी, एसआयटी आणि न्यायालयीन पातळीवर सुरु झालेला आहे. या हत्येच्या पाठीशी जे राजकीय लोक आहेत, त्यांच्याबद्दल जनमाणसात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणात बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी आरोपींना कठोर शिक्षा करण्याची मागणी केलेली आहे. दरम्यान बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करत बीडमधील सपोनि.गणेश मुंडे आणि सपोनि.दहिफळे या दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकार्यांचे कॉल रेकॉर्ड तपासण्याची मागणी केली आहे.खासदार सोनवणे यांच्या मागणीनंतर बीड पोलीस खळबळ उडाली आहे. दहिफळे आणि मुंडे या दोघांबद्दलही सर्वसामान्यासोबतही पोलीस दलात देखील फारसे चांगले बोलले जात नाही. त्यातच सपोनि.गणेश मुंडे यांनी एसपींच्या अधिपत्याखाली सुरु केलेल्या बीड पोलीस प्रेस या व्हाटस्अप ग्रुपवर शनिवारी सायंकाळी एक पोस्ट केली,ज्यामध्ये म्हटले होते की, 'या खासदाराची चड्डी सुध्दा जागेवर राहणार नाही, मी जर प्रेस घेतली तर'. असे म्हटले आहे. या पोस्टवर काही पत्रकारांनी विचारपूस केल्यानंतर सदरील पोस्ट मुंडे यांनी डिलिट केली, आणि स्थागुशाचे पो.नि.उस्मान शेख यांनी मुंडे यांना ग्रुपमधून काढून टाकले. अशा वाचाळ आणि धमकी देणार्या पोलीस अधिकार्यावर एसपी नवनीत कांवत काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# एसपीसाहेब त्या चाळीस शस्त्र परवण्यांचे दिलेले अहवाल फेटाळा –अ‍ॅड. देशमुख

बीड । प्रतिनिधी

**जिल्हाधिकारी पदावर रुजू झाल्यानंतर पहिल्याच भेटीत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आम्हाला बीड जिल्ह्यात नवीन शस्त्र परवाने मंजूर करण्यास नसल्याची हमी दिली होती. त्यांनी अजून पर्यंत तरी नवीन परवानगी दिली नाही. या उलट त्यांच्याकडे मंजुरीसाठी आलेल्या दोनशे बासष्ट परवण्याचे अर्ज त्यांनी फेटाळले. त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. मात्र आता जे चाळीस अर्ज प्रलंबित आहेत, ते अर्ज देखील फेटाला, अशी मागणी जन आंदोलनाचे विश्वस्त अ‍ॅड. अजित देशमुख यांनी केली आहे.**



जिल्हाधिकारी कार्यालयात आज शस्त्र परवाण्यासाठी चाळीस अर्ज प्रलंबित आहेत. जे २६२ अर्ज फेटाळले गेले ते सर्वसामान्य लोकांचे होते. हे चाळीस अर्ज प्रभावशाली लोकांचे आहेत. त्यामुळे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी पोलिसांनी दिलेले हे सर्व अहवाल परत मागून ते फेटळून लावावेत. तसेच जिल्हाधिकारी यांनी हे अर्ज तातडीने फेटाळले पाहिजेत, मागणी ही अ‍ॅड. देशमुख यांनी केली आहे.

गुन्हेगारी जगतामध्ये बीडचे नाव मोठ्या प्रमाणात कोरले गेले आहे. त्यातच अशा प्रकारचे शस्त्र परवाने लोकांना का लागतात ? हा देखील प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे या प्रभावशाली चाळीस लोकांचे शस्त्र परवाण्याचे अर्ज तातडीने फेटाळले, तरच लोकांचा प्रशासनावरचा विश्वास वाढणार आहे. यामध्ये राजकीय प्रभावशाली व त्यांचे बगलबच्चे यांचे अर्ज प्रलंबित असल्याचे समजते. पुरोगामी महाराष्ट्रात राजकारण काही काळ आणि नंतर समाजकारण या उद्देशाने सरकार चालत होते. आता परिस्थिती

# अंबिका चौक ते कार्तिकी लॉज रस्ता कामाची आ.क्षीरसागरांकडून पाहणी

## कामाचा दर्जा चांगलाच ठेवण्याच्या दिल्या सूचना

बीड । प्रतिनिधी

शहरातील अंबिका चौक ते कार्तिकी लॉज पर्यंतच्या सुरू असलेल्या रस्ता व नाली बांधकामाची रविवारी (दि.५) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी पाहणी केली. यावेळी कामाच्या दर्जाबाबत आ.क्षीरसागर यांनी संबंधित यंत्रणेला सूचना दिल्या.

राज्य महामार्ग २२२ वरून जोडवाडी–धारवंटा–साक्षाळपिंप्री–पारगाव सिरस–खापर पांगरी–बीड–एमआयडीसी ते कुर्ला प्रजिमा क्र.१८ वर सिमेंट–कॉंक्रिट रस्ता करणे व नाली बांधकाम करणे. या कामांतर्गत शहरातील पांगरी रोड वर सिमेंट रस्ता व नाली बांधकामाचा आ.संदीप क्षीरसागर यांनी ५ ऑक्टोबर २०२४ रोजी शुभारंभ केला होता. यातील






अंबिका चौक ते कार्तिकी लॉज पर्यंतचे काम सध्या सुरू आहे. या कामाची आ.संदीप क्षीरसागर यांनी माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह रविवारी पाहणी केली. यावेळी होत असलेले काम दर्जेदारच झाले पाहिजे. तसेच हे लवकरात लवकर पूर्ण करुन नागरिकांच्या रहदारीसाठी हा रस्ता सुरु करावा. अशा सूचनाही आ.संदीप क्षीरसागर यांनी संबंधित यंत्रणेतील अधिकारी आणि गुत्तेदार यांना दिल्या. याप्रसंगी या भागातील सर्वसामान्य नागरिकही उपस्थित होते.

# संविधान बचाव जन आक्रोश मोर्चास मोठ्या संख्येने उपस्थित रहा–सरवदे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रामध्ये भाजप सत्तेमध्ये आल की मागासवर्गीय विरोधी अजेंडा सामोरे ठेवत विरोध केला जातो परभणी येथे करण्यात आलेल्या संविधान प्रतिमेची विटंबना करण्यात आली होती आंदोलन दरम्यान पोलीस प्रशासनाने भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी या अभ्यासू तरुणाची पोलीस कोठडीत हत्या करण्यात आली तसेच संसदेत गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबत ऐकेरी भाषेत जाणीवपूर्वक केलेले विधान तसेच विविध मागण्यांसह सरकारच्या विरोधात दि. ०६ जानेवारी २०२५ रोजी बीड शहरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने भव्य संविधान बचाव जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाचे आयोजक सर्व आंबेडकरवादी कार्यकर्ते असून वंचित बहुजन आघाडीतील सर्व जिल्हा–तालुका–शहर पदाधिकारी ताकतीने या मोर्चामध्ये एक सच्चा भीमसैनिक म्हणून सहभागी होणार आहेत शहरातील प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून या मोर्चास उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष (प) अजय सरवदे यांनी केले आहे. मोर्चाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे येणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.


# तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्था संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेची यावर्षीची सहल कोकण तसेच महाबळेश्वर प्रति बालाजी या परिसरामध्ये गेली चार दिवस मुक्काम व सहल एकूण सहा दिवसाची होती.सहल दिनांक ३१ डिसेंबरला सुरुवात होऊन ४ जानेवारी २०२५ ला संपन्न झाली शाळेचे मुख्याध्यापक श्याम डाके सर यांच्या नेतृत्वाने व मार्गदर्शनाने सहलीचे आयोजन करण्यात आले

या सहलीचे सहल प्रमुख सहशिक्षक श्री शिवाजी पवार सर यांनी जबाबदारी पाहिली

या सहलीसाठी अथक परिश्रम घेणारे विद्यार्थी प्रिय शिक्षक श्री श्रीहरी लहाने सर श्री कल्याणजी वामने सर श्री गणेश जी काशीद सर सेवक श्री काटवटे नाना व राजेभाऊ काळे इत्यादींची खूप खूप सहकार्य



लाभले.सहल सुरुवातीला पंढरपूर विठ्ठलाचे दर्शन घेऊन दत्ताच्या दर्शनासाठी नृसिंहवाडी येथे गेली असता त्या ठिकाणी सकाळचा नाश्ता स्नान होऊन कोल्हापूर परिसर पाहण्याचा विद्यार्थ्यांनी आनंद घेतला या मध्ये कनेरी मठ देवीचे दर्शन न्यू पॅलेस रंकाळा धरण पन्हाळगड ज्योतिबा दर्शन व ज्योतिबा मध्ये मुक्काम केला त्यानंतर दुसऱ्या दिवशी श्री नरेंद्र स्वामी यांचे नानिज्धाम मठ पाहून गणपतीपुळे येथे सागराच्या पाण्याचा आनंद घेतला व नवसाला पावणाऱ्या गणपतीचे दर्शन घेऊन गणपतीपुळे या ठिकाणी मुक्काम केला दुसऱ्या दिवशी सहल रत्नदुर्ग किल्ला रत्नागिरी येथे पाहून येथील अरबी समुद्रात चा आनंद घेतला जेवणाचे सर्व साहित्य सोबत नेण्याची नियोजन सर्व शिक्षक व सेवक मंडळींनी केल्यामुळे विद्यार्थ्यांना रुचकर व ताजे अन्न खावयास मिळाले यासाठी काळे मावशी शोभाताई काळे काटवटे नाना व काटवटे नाणी राजेभाऊ काळे इत्यादींनी परिश्रम घेतले श्री काशीद सर यांची फोरव्हीलार गाडी खाण्याचे साहित्य घेऊन सोबत होती

त्यानंतर तिसऱ्या दिवशी सहल श्रीवर्धन बीच व दक्षिण ◀◀ पान ३ वर

# टँकरखाली चिरडून शेतकऱ्याचा मृत्यू

मांजरसुंबा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ससेवाडी येथील रामभाऊ भानुदास सावंत( वय ४८) हे शेतकरी दूध विक्री करून ससेवाडी कडे जात असताना भरधाव वेगाने येणाऱ्या टँकरने त्यांना चिरडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला ही घटना रविवारी सकाळी आठच्या सुमारास ससेवाडी फाट्याजवळ घडली.

ससेवाडी येथील शेतकरी रामभाऊ भानुदास सावंत हे दूध विक्री करून गावाकडे आपल्या मोटरसायकल वरून (क्रमांक २३/६०६७ ) वरून जात असताना वेगाने येणाऱ्या टँकरने ( १४ ८७ ४४ ) त्यांना समोरच्या टायर खाली चिरडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना घडल्यानंतर संतप्त जमावाने टँकरची तोडफोड करून टँकर चालकाला नेकनूर पोलिसांच्या ताब्यात दिले. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी टँकर चालकावर नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लुटमार करणारे आरोपी मुद्देमालासह पकडले; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जालना । प्रतिनिधी

होन्डा कंपनीच्या शाईन मोटारसायकल ने रात्री २१.३० वाजेच्या सुमारास कन्हैया नगर ते नाव्हा चौफुली बायपासने घराकडे जात असतांना वनविभाग कार्यालया जवळ पाठीमागुन एक मोटारसायकलवरुन दोन अनोळखी ईसमांनी त्यांना ओव्हरटेक करुन त्यांना थांबवून त्यांना मोटारसायकल वरुन खाली पाडुन त्यांचे खिशातील १०००० रु किंमतीचा वन प्लस कपंनीचा नोर्ड २ मोबाईल व ३०,००० रु किंमतीची हॉन्डा कंपनीची शाईन मोटारसायकल ही बळजबरीने हिसकावून नेले म्हणून अज्ञात आरोपीतां विरुद्ध पोलीस ठाणे तालुका जालना येथे गु.र.नं. ४४२/२०२४ कलम ३०९(४) भा.न्या.सं. गुन्हा दाखल झाला होता.

स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी वं अंमलदार हे नमुद गुन्ह्यातील अज्ञात गुन्हेगारांचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारामार्फत व तांत्रिक माहितीच्या आधारे सदरचा गुन्हा हा आरोपी रामेश्वर दिलीप कावळे रा. मोगलाई चौक, जालना याने त्याचे साथिदार नामे २) संदीप जितेश लिदोरे रा. वल्ली मामु दर्गा जालना ३) रोहित ज्ञानेश्वर ननवरे रा. श्रुती कॉलनी, महिंन्द्रा शोरुमच्या मागे, जालना यांचे सह गुन्हा केल्याची कबुली दिल्याने तिन्ही आरोपीतांना विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली देऊन त्यांचे कडून गुन्हयातील फिर्यादीचा १०००० रु किंमतीचा वन प्लस



कपंनीचा नोर्ड २ मोबाईल व फिर्यादीची ३०,००० रु किंमतीची हॉन्डा कंपनीची शाईन मोटारसायकल व गुन्हा करतांना वापरलेली १०,००० रु किंमतीची हिरो कंपनीची पैशन प्लस मोटार सायकल असे एकुण ५०,००० रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमलदार सैम्युअल कांबळे, लक्ष्मीकांत आडेप, सुधीर वाघमारे, भाऊराव गायके, सागर बाविस्कर, सतिश श्रीवास, आक्रूर धांडगे, योगेश सहाने, धीरज भोसले, कैलास चेके यांनी केली आहे.

# एक दिवस गेवराई तालुक्याचा विद्यार्थी खेळाडू देश पातळीवर खेळेल– रणवीर पंडित

## दिमाखदार सोहळ्यात गेवराई येथील चौथ्या क्रीडा महोत्सवाचे भव्य उद्घाटन

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळाडूना क्रीडा क्षेत्रामध्ये नाव कमावण्यासाठी माजी मंत्री आदरणीय शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत क्रीडा महोत्सवाचे गेल्या तीन वर्षापासून आयोजन करण्यात येत आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून तालुक्याच्या ग्रामीण भागातील खेळाडू राज्य पातळीवर गेले असून एक दिवस गेवराई तालुक्यातील मुलगी किंवा मुलगा देश पातळीवर खेळेल आणि या तालुक्याचा नाव लौकिक होईल असा विश्वास शारदा स्पोर्ट्स अकादमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत चौथ्या क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

शारदा स्पोर्ट् अ‍ॅकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून



जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत चौथ्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन गेवराई येथील शारदा विद्या मंदिराच्या भव्य मैदानावर रविवार दिनांक ०५ जानेवारी रोजी करण्यात आले. या वेळी दै. रिपोर्टर चे कार्यकारी संपादक गणेश सावंत,

दै. सकाळचे जिल्हा प्रतिनिधी दत्तात्रय देशमुख, राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलचे तालुकाध्यक्ष खालेदभाई कुरेशी, नगरसेवक शाम येवले, जेष्ठ विधिज्ञ स्वप्नील येवले, सय्यद खाजा मामू, दत्तात्रय दाभाडे, सरपंच विष्णुपंत घोंगडे, संदीप मडके, अक्षय पवार, किरण दाभाडे, राम म्हेत्रे, बाळासाहेब दाभाडे, अप्पासाहेब परळकर, शेख मोहसीन यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रारंभी दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. स्काउट– गाईड पथक, भारतीयम पथक, सांस्कृतिक पथकाच्या विद्यार्थ्यांनी संचलन करून मानवंदना दिली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मैदान पूजन आणि खेळाडूचा परीचय करून सामान्यांना प्रारंभ झाला. शुभारंभाचा सामना शारदा विद्या मंदिर बीड विरुद्ध माध्यमिक विद्यालय सिरसदेवी आणि दुसरा सामना माध्यमिक विद्यालय खालेगाव विरुद्ध माध्यमिक विद्यालय मारफळा यांचं दरम्यान झाला. यावेळी बुद्धीबळ स्पर्धांचाही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

रणवीर पंडित यांनी आपल्या मातीतील खेळाडूना संधी दिली– गणेश सावंत

यावेळी बोलताना पत्रकार गणेश सावंत म्हणाले की, शिवछत्र परिवारातील तिसरी पिढी राजकारण्याच्या पलीकडे जाऊन समाज विधायक कामामध्ये उतरली आहे. रणवी पंडित या युवकाने आपल्या मातीतील विद्यार्थी खेळाडूना क्रीडा क्षेत्रामध्ये करिअर करण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली. राज्य आणि देश पातळीवर विद्यार्थी खेळले पाहिजेत हा उद्देश घेऊन ते मैदानात उतरले आहेत. एक ध्येय घेऊन आणि संघर्ष करून ते काम ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...


पुणे विशेष

सोमवार, दि.६ जानेवारी २०२५ । पान ७

# पीएमआरडीए कार्यालयात नोकरभरतीचा मार्ग मोकळा

पिंपरी । प्रतिनिधी

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयातील नोकर भरतीला राज्याचा हिरवा कंदील मिळाला आहे. आकृतीबंदाला मंजुरी दिल्यानंतर आता राज्याने सेवा प्रवेश नियमावली जाहीर केली आहे. त्यामुळे एमपीएससी आणि जिल्हा निवड समितीच्या माध्यमातून जवळपास दीडशे पदांची पदभरती केली जाणार आहे. पुढील कार्यावाही पार पडल्यानंतर पीएमआरडीएला स्वतंत्र मनुष्यबळ प्राप्त होणार आहे.




पीएमआरडीएचे एकूण क्षेत्र सुमारे ७ हजार २५६ चौरस किलोमीटर इतके आहे. पीएमआरडीएच्या स्थापनेपासून वरिष्ठ पदांवर विविध विभागातील अधिका-यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक केली जात होती. तर, कारकून, शिपाई ही पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येत होती. प्राधिकरणात वर्ग एक ते वर्ग चारच्या विविध पदांवर वेगवेगळ्या विभागामध्ये कर्मचा-यांची आवश्यकता आहे. त्यानुसार पीएमआरडीएकडून राज्याकडे मागणी पत्र सादर केले होते. त्यापैकी विधी अधिकारी, लिपिक, मुख्य विधी अधिकारी, शाखा अभियंता या पदांसाठी शासनाकडे माहिती पाठवली असून ही पदे एमपीएससीमार्फत भरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारने पीएमआरडीएच्या आकृतीबंधाला यापूर्वीच मंजुरी दिली होती. मात्र, सेवा प्रवेश आणि सेवांचे वर्गीकरण (विनियम २०२३) या नियमावलीची मंजुरी प्रलंबित होती. राज्य सरकारच्या नगरविकास विभागाचे सहसचिव यांनी याबाबत नुकताच शासन निर्णय जारी केला आहे. त्यामुळे पीएमआरडीएकडून विविध विभागांतील सेवा नियमावली प्रसिद्ध करण्यात आली आहे. या पदांपैकी काही पद जिल्हा निवड समितीमार्फत भरली जाणार आहेत. त्यानुसार राज्य शासनाकडून नेमण्यात आलेल्या दोन कंपन्यांमार्फत त्या पदांची माहिती पाठवण्यात आलेली आहे. त्यामध्ये लघुलेखक, कनिष्ठ आरेखक, सर्वे रियर, वाहन चालक आणि शिपाई या पदांचा समावेश आहे. त्यामुळे ही पदे भरण्याबाबत प्राधिकरणामार्फत कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

# ...त्यामुळे पैलवानांची संख्या कमी पडतेय -माजी आमदार दिलीप मोहिते

चिंबळी । प्रतिनिधी

गावा गावात अजूनही पारंपरिक पद्धतीने यात्रा भरविली जाते आणि कुस्ती स्पर्धेत आयोजन केले जाते, त्यासाठी भरपूर बक्षीस देण्यात येते म्हणून पैलवान घडविण्यासाठी लाखो रुपये खर्च केले जातात; परंतु पैलवानांना कुस्ती स्पर्धेसाठी येण्याजाण्यासाठी खर्च ही होतो, त्यामुळे पैलवानांची संख्या कमी पडत आहे, असे प्रतिपादन माजी आमदार दिलीप मोहिते यांनी मरकळ येथे केले.

मरकळ (ता. खेड) येथे जय हनुमान भैरवनाथ महाजनांच्या उत्साहा निमित्त गुरवार (दि. २) ते शनिवार (दि. ४) विविध धार्मिक कार्यक्रमासह बैलगाडा शर्यती भरविण्यात आल्या होत्या. यावेळी माजी आमदार मोहिते पाटील यांच्या हस्ते कुस्ती लावण्यात आली त्यावेळी ते बोलत होते असे माजी सरपंच राजाराम लोखंडे यांनी सांगितले.



गुरुवारी सकाळी आठ ते नऊ श्रीची महापुजा व पालखी (छबीना) हारतुरे मांडव डहाळे मिरवणूक, अभिषेक, बैलगाडा शर्यती, कुस्ती स्पर्धा करमणुकीसाठी लोकनाटच्य तमाशा, आर्केस्ट्रा आदि कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. उत्साहा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडा शर्यतीमध्ये दोन दिवस २५० बैलगाडे सहभागी झाले होते तर कुस्ती स्पर्धेत सुमारे मल्ल सहभागी होऊन कुस्ती शौकीनांची मने बहारून टाकली. या कस्ती स्पर्धेत श्री हनुमान भैरवनाथ महाराज उत्सव कमिटी, ग्रामस्थ, माजी अध्यक्ष किरण पाचपुते यांच्या वतीने एक चांदीची गदा यांच्या वतीने दादा शेळके व शुभम शिदनाळे यांच्यात ३ लाख ३३ हजार रुपयांची कुस्ती माजी आमदार दिलीप मोहिते यांच्या हस्ते लावण्यात आली. या कुस्तीमध्ये शुभम शिदनाळे यांने चांदीची गदा पटकावली. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थ व जय हनुमान भैरवनाथ उत्सव कमिटीच्या वतीने करण्यात आले होते.

# पुण्यात अल्पवयीन मुलांचे अपहरण करुन लुटले; सिगारेटच्या बहाण्याने कारमध्ये बसवलं

पुणे । प्रतिनिधी

राज्यात लुटमारीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून घटना उघडकीस येत आहेत. यामुळे पोलीसही हैराण झाले आहेत. अशातचं आता सिगारेट मागण्याच्या बहाण्याने जवळ जावून तिघांनी दोन अल्पवयीन मुलांचे अपहरण करून त्यांना मारहाण करून लुटल्याची घटना कात्रज-देहूरोड बायपासवर नऱ्हे परिसरात घडली आहे. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. सागर शिरोळे, संग्राम मोरे आणि विराज भोसले अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी जित पांडुरंग कांबळे (वय १८, रा. सातारा) या तरुणाने तक्रार दिली आहे. त्यावरून सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. ही घटना तीन जानेवारीला पहाटे दोन ते चार या वेळेत घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार आणि त्याचे दोन अल्पवयीन मित्र नऱ्हे परिसरातील ओमकार लॉज बाहेर थांबले होते. त्यावेळी आरोपी त्यांच्याजवळ आले. त्यांनी तक्रारदार आणि त्याच्या मित्रांकडे सिगारेट मागण्याचा बहाणा केला. मुलांनी सिगारेट नसल्याचे सांगितले असता, आरोपींनी त्यांच्याशी वाद घातला आणि जबरदस्तीने त्यांना कारमध्ये बसविण्याचा प्रयत्न केला. यामध्ये तक्रारदार आरोपींच्या हातून निसटला. त्याने तेथून पळ काढला. मात्र, इतर दोन मुलांना आरोपींनी कारमध्ये बसवले आणि तेथून पळ काढला. कारमध्ये त्यांनी मुलांकडील तीन मोबाइल हिसकावून घेतले. त्यांना हाताने मारहाण केली. त्यानंतर एका मुलाला अज्ञात स्थळी सोडले. तेथून पुढे गेल्यानंतर दुसऱ्या मुलाला कारमधून उतरवले आणि ते पसार झाले. दरम्यान, तक्रारदाराने या काळात सिंहगड रस्ता पोलिसांना संपर्क साधून घडलेल्या प्रकाराची माहिती दिली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून परिमंडळ तीनचे उपायुक्त संभाजी कदम यांनी तातडीने तपासाचे आदेश दिले. यामध्ये स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखेच्या पोलिसांची पथके देखील कामाला लागली होती. अवघ्या दीड तासात पोलिसांनी आरोपींचा माग काढून त्यांना ताब्यात घेतले.

# रस्ते, पदपथ मोकळे करा; केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांच्या सूचना

पुणे: रस्ते आणि पदपथांवरील अतिक्रमणांवर कारवाई करण्याच्या सूचना देऊनही केवळ कारवाईचा दिखावा केला जात आहे. ठोस कारवाई होताना दिसत नाही. पदपथांवर, रस्त्यावर झालेली अतिक्रमणे तातडीने कारवाई करून अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने रस्ते आणि पदपथ मोकळे करावेत, त्याविरोधात कोणी दबाव टाकत असेल तर दबावाला बळी पडू नका, अशा सूचना केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी महापालिका प्रशासनाला केल्या. कारवाईस टाळाटाळ केल्यास संबंधित अधिकार्यांवर कारवाई करण्याचाही इशारा त्यांनी या वेळी दिला.



मोहोळ यांनी महापालिकेत शहरातील विविध प्रकल्पांची आढावा बैठक घेतली. या वेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले, आमदार हेमंत रासने, सुनील चव्हाण, भीमराव तापकीर, शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्यासह पालिका अधिकारी व भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. मोहोळ यांनी काही दिवसांपूर्वी शहरातील अतिक्रमणे काढण्याच्या सूचना पालिका प्रशासनाला केल्या होत्या. दोन दिवसच कारवाईचा दिखावा झाला, त्यानंतर मात्र शहरातील अतिक्रमणे कमी होण्याऐवजी मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी रस्ते व पदपथांवर अतिक्रमण करणार्यांवर कारवाई करून ती अतिक्रमणमुक्त करण्याच्या सूचना पुन्हा केल्या.

# गाडीवर दंड आकारल्याचा राग मनात धरून पोलिसाला लाथाबुक्क्यांनी मारहाण

पिंपरी: गाडीवर दंड आकारल्याचा राग मनात धरून एका तरुणाने वाहतूक पोलिसाला भर रस्त्यात लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. ही घटना शुक्रवारी (दि. ३) सकाळी मरकळ चौक, आळंदी येथे घडली. विजय जरे (३३) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.



आळंदी वाहतूक शाखेतील सहायक पोलीस उपनिरीक्षक अंकुश वाडेकर (५४) यांनी शुक्रवारी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी वाडेकर हे मरकळ चौक, आळंदी या ठिकाणी वाहतक नियमन करीत होते. त्या वेळी आरोपी जरे याने फिर्यादी वाडेकर यांनी यापूर्वी त्याच्या गाडीवर दंडाची पावती केल्याचा राग मनामध्ये धरून, तुला माहीत नाही का, मी स्थानिक आहे. गाडीवर तू पावती का करतो तुला इथे राहायचे नाही का, अशी धमकी दिली. त्यानंतर आरोपी जरे याने फिर्यादी वाडेकर यांनी घातलेल्या युनिफॉर्मच्या शर्टाला पकडून शर्टाची बटने तोडली. वाहतूक पोलीस वाडेकर यांच्या गालावर जोरात चापट मारली. त्याला प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता पुन्हा त्याने फिर्यादीच्या डोक्यात व छातीवर लाथा व बुक्क्याने मारहाण केली. या घटनेमुळे मरकळ चौक या ठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती.

# गोळीबार अन् दगडफेकेतील गुन्हेगार जाळ्यात; युनिट सहाच्या पथकाची मोठी कारवाई

पुणे । प्रतिनिधी

थेऊर परिसरात लघुशंका करणाऱ्यांना हटकल्यानंतर टोळक्याने केलेल्या दगडफेक तसेच हवेतील गोळीबार प्रकरणात फरार असणाऱ्या दोन गुन्हेगारांना गुन्हे शाखेच्या युनिट सहाने सापळा रचून अटक केली आहे. या दगडफेकीत सुरक्षा रक्षकाच्या पत्नीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. मयूर शंकर जाधव (वय ३२, रा. मु.पो. कुरुळी, बांदल वस्ती, दत्त मंदिराच्या बाजूला ता. खेड), प्रथमेश उर्फ सोन्या आनंदा वाहिले (वय २३, रा केळगाव, चिंबळी, आळंदी रोड, राधाकृष्ण मंदिराजवळ ता. खेड) अशी अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत.



त्यांना पुढील कारवाईसाठी लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात येत आहे. ही कारवाई ही पोलीस निरीक्षक वाहीद पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली राजेश लोखंडे, प्रदीप राठोड, कानिफनाथ कारखेले, संदीप येळे, समिर पिलाणे व त्यांच्या पथकाने केली आहे. थेऊर येथील वाघोली-थेऊर रस्त्यावर जय मल्हार हॉटेलजवळ गेल्या आठवड्यात मोकळ्या प्लॉटवर कारने जाणारे टोळके थांबले होते. त्यांनी लघुशंका केली. तेव्हा येथे लघुशंका करू नका असे येथील सुरक्षा रक्षकाने सांगितले होते. त्याचा त्यांना राग आला होता. टोळक्याने वाद घालत दगडफेक केली. सुरक्षा रक्षक अक्षय चव्हाण व पत्नी शीतल चव्हाण यांना मारहाण केली. तसेच, एकाने हवेत गोळीबार देखील केला होता. दगडफेकीत शीतल चव्हाण या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा दोन दिवसांपुर्वी मृत्यू झाला होता. यामुळे थेऊर परिसरात तणावाचे वातावरण पसरले होते. दरम्यान या घटनेतील तिघांना अटक करण्यात आली होती, तर अन्य फरारींचा शोध सुरू होता. अखेर फरारी गुन्हेगारांपैकी दोघांना खेड शिवापूर येथून ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले आहे. दोघेही पळून जाण्याच्या तयारीत होते. मात्र, त्यापुर्वीच त्यांना पकडण्यात आले. त्यांना पुढील कारवाईसाठी लोणी काळभोर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# आळंदीत महाराजाने केले दोन अल्पवयीन मुलांशी अनैसर्गिक कृत्य



आळंदी । प्रतिनिधी

आळंदी येथील एका वारकरी शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या दोन अल्पवयीन वारकरी साधक विद्यार्थ्यांवरती सोबत राहणाऱ्या अठ्ठावीस वर्षीय महाराजाने अनैसर्गिक कृत्य केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून यात त्याला एका महिलेने देखील मदत केल्याचे समोर आले आहे.

आळंदी पोलिसांनी आरोपी वरती पॉँस्को अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. महेश नामदेव मिसाळ (टोपण नाव मामा) (वय २८ वर्षे रा. खोकरमोहा, ता. शिररकासार, जि.बीड) असे आरोपीचे नाव असून त्याला अटक करण्यात आली तर साथीदार महिला आरोपी वरील आरोपाचा तपास सुरू असून तिला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. याबाबत आळंदी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की आळंदी येथे वारकरी शिक्षण देणारी खाजगी संस्था आहे. यात अल्पवयीन मुले वारकरी शिक्षण घेत आहेत. यात आरोपी देखरेखीच काम पाहत होता. शनिवारी ( दि.४) रोजी रात्री दोन अडीच वाजण्याच्या सुमारास आरोपीने ही मुले झोपली असताना त्यांच्या सोबत अनैसर्गिक कृत्य केले. याबाबत सदर महिलेला समजल्यावर तिने प्रकार झाकण्याचा प्रयत्न केला. मुलांनी याबाबत आपल्या आईला सांगितल्यावर सदर प्रकार उघडकीस झाला असून मुलाच्या आईने फिर्याद दिल्यावर महराजाला गजाआड करण्यात आले आहे. पुढील तपास आळंदी पोलीस करत आहेत.

# दारुसाठी पैसे न दिल्याने एकाचा खून, आरोपीला अटक

पुणे : दारू पिण्यासाठी पैसे न दिल्यामुळे एकाच्या डोक्यात सिमेंटच्या गट्टूने मारहाण करून खून केल्याची घटना लोणी काळभोर परिसरात घडली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

योगेश लक्ष्मण काळभोर (वय ४५, रा. लोणी काळभोर, ता. हवेली) असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत पोलिस अंमलदार केतन उत्तम धेंडे यांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून नंदू ऊर्फ पोपट लक्ष्मण म्हात्रे (वय ३९, रा. लोणी काळभोर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, योगेश काळभोर आणि सोमनाथ जाधव हे १५ डिसेंबर रोजी सायंकाळी लोणी काळभोरमधील रायवाडी भागात दत्तात्रेय कांबळेच्या खोलीत दारू पीत बसले होते. त्यावेळी नंदूने दारू पिण्यास पैसे देत नाहीस, असे म्हणत योगेशला शिवीगाळ केली. त्यानंतर योगेशच्या डोक्यात सिमेंटच्या गट्टूने मारहाण केली. त्यात गंभीर जखमी झाल्याने योगेशला रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याबाबत प्रारंभी पोलिसांनी अकस्मात मृत्यू नोंद केली. तपासादरम्यान पोलिसांनी प्रत्यक्षदर्शी सोमनाथ जाधव, दत्तात्रेय कांबळे यांच्याकडे चौकशी केली. त्यावेळी दारू पिण्यास पैसे न दिल्याने आरोपीने योगेशच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू मारुन खून केल्याचे उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपी नंदू म्हात्रेला अटक केली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार करीत आहेत.

# तरुणीला धमकावून तिघांकडून अत्याचार

पुणे । प्रतिनिधी

तरुणीला जीवे मारण्याची धमकी देऊन तिघांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची खळबळजनक घटना भारती विद्यापीठ परिसरात शुक्रवारी सायंकाळी घडली.

याबाबत पीडित तरुणीने भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून पीडित तरुणीची मैत्रीण (वय २१), तिचा मित्र (वय २८) यांच्यासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणीला तिच्या मैत्रिणीने खोटे बोलून मित्राच्या घरी नेले. त्यानंतर मैत्रिणीने तरुणीला 'तुला या तिघांसमवेत थांबावे लागेल, अन्यथा तुला जीवे मारू' अशी धमकी दिली. त्यानंतर तिघा तरुणांनी तरुणीवर लैंगिक अत्याचार केला. आरडाओरडा केल्यास मारण्याची धमकी दिली. याबाबत माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक स्नेहल थोरात करीत आहेत.

# देशमुख हत्या प्रकरणी पुण्यात जनआक्रोश मोर्चा, कराडला फाशीची शिक्षा द्या: संतप्त नागरिकांची सरकारकडे मागणी

पुणे । प्रतिनिधी

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केल्यानंतर आता देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. वाल्मीक कराडला फाशी झाली पाहिजे, मारेकरांना कठोर शिक्षा द्या, अशी घोषणाबाजी करत हजारो नागरिकांनी एकत्र येत लाल महाल ते जिल्हाधिकारी कार्यालय असा जनआक्रोश मोर्चा काढला.




संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या दोन्ही घटनांचे तीव्र पडसाद राज्यभरात उमटले आहेत. बीड, परभणीमध्ये निषेध मोर्चा काढल्यानंतर पुण्यातही जनआक्रोश मोर्चातून बीड हा दहशतीचा बालेकिल्ला झाला आहे, असे सांगण्यात आले. कराडसारखे गुन्हेगार मोकाट फिरू लागले आहेत. यामुळे त्याला कठोर शिक्षा करण्याची मागणी गृहमंत्री दवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे नागिरकांनी सांगितले. तसेच सरकारने बीड प्रकरणात गांभीर्याने द्यावे, अशी विनंती करणार असल्याचे देखील नागरिक यावेळी म्हणाले.

कराडच्या फोटोला जोडे मारू

या आंदोलनात सहभागी झालेल्या नागरिकांच्या संप्तत झाल्याने भावना पाहिला मिळाल्या. तसेच नागरिकांनी कराडच्या फोटोला जोडे मारू आंदोलन करीत या घटनेचा तीव्र निषेध नोंदविला. यावेळी जय भवानी जय शिवाजी अशा घोषणा देण्यात आल्या. कराडला अटक झाली असली तरी तुरुंगात व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात असल्याचा आरोप नागरिकांना यावेळी केला.

# धनकवडीत टोळक्याची कोयता उगारुन दहशत

पुणे । प्रतिनिधी

धनकवडीत कोयते उगारून टोळक्याने चार मोटारी, तसेच दुचाकींची तोडफोड केल्याची घटना घडली. याप्रकरणी सहकारनगर पोलिसांनी टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

तोडफोड प्रकरणात साहिल दुधाणे याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पियुष मोहन चव्हाण (वय २०, रा. ओम शिवशंभो हाइट्स, मोहननगर, धनकवडी) याने सहकारनगर पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुधाणे याच्याशी चव्हाण याचा वाद झाला होता. बुधवारी रात्री आरोपी दुधाणे आणि साथीदारांनी चव्हाणला धनकवडी परिसरात अडवून चव्हाण आणि त्याच्याबरोबर असलेल्या मित्रांना कोयत्याचा धाक दाखविला. मला धनकवडीचा भाई म्हणतात, असे सांगून त्याने त्यांच्यावर कोयते उगारत जीवे मारण्याची धमकी दिली.

आरोपींनी धनकवडीतील बसथांब्याजवळ रस्त्यावर लावलेल्या चार मोटारींच्या काचा, तसेच दोन दुचाकींची तोडफोड केली. चव्हाणला धमकावून आरोपी मोटारीतून पसार झाले. हवालदार चव्हाण तपास करत आहेत.

# फर्ग्युसन रस्त्यावरील अतिक्रमणांवर कारवाई

पुणे : महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून अखेर फर्ग्युसन रस्त्यावरील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत महापालिकेने पदपथ, तसेच इमारतींच्या साइड आणि फ्रंट मार्जिनमध्ये मोठ्या प्रमाणावर थाटलेल्या दुकानांमधील मालही जप्त करण्यात आला आहे.

या रस्त्यावर चालण्यासही जागा नसल्याने, तसेच मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याने वाहतूक कोंडी वाढली होती. त्यामुळे नागरिकांकडून सतत तक्रारी करण्यात येत होत्या. मात्र, महापालिका प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात होते. शनिवारी खासदार मुरलीधर मोहोळ यांनी महापालिकेच्या विकासकामांचा आढावा घेण्यासाठी बैठक बोलविली होती. या बैठकीत मोहोळ यांच्यासह सर्वच आमदारांनी शहरातील अतिक्रमणांबाबत थेट नाराजी व्यक्त केली. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या महापालिका प्रशासनाकडून आज तातडीने छत्रपती संभाजी महाराज पुतळा ते ज्ञानेश्वर महाराज पादूका चौकापर्यंत दुर्तफा कारवाई करण्यात आली. महापालिकेचा बांधकाम विभाग, तसेच अतिक्रमण विभागाकडून संयुक्तपणे ही कारवाई करत अतिक्रमण विभागाने जवळपास दहा ट्रक माल जप्त केला आहे. याशिवाय बांधकाम विभागाने सुमारे ४ हजार चौरसफूट बांधकाम पाडून टाकले आहे.